दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -१३० बुधवार,दि.१५ जानेवारी २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-130 Wednesday, Dt.15 January 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## परळी शहर क्षणातच बंद!

# परळीत तणाव : वाल्मीक कराड समर्थकांकडून परळीत दिवसभर आंदोलन !





### माझ्या मुलाला न्याय द्या- वाल्मीक कराड यांच्या आईचा परळी पोलिस ठाण्यासमोर ठिय्या

### टॉवरवर चढून, पेट्रोल ओतून घेत आत्मदहन करण्याचाही काही जणांचा प्रयत्न

### टायर जाळले,रास्ता रोको, बसवर दगडफेकीच्या घटना






परळी / प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण संपूर्ण राज्यात चर्चेत आहे.याअनुषंगाने आवादा कंपनीच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या खंडणीच्या गुन्ह्यात आरोपी असलेले वाल्मीक कराड यांच्यावर अन्याय होत असून माझ्या मुलाला न्याय द्या अशी मागणी करत वाल्मीक कराड यांच्या आईने परळी पोलीस ठाण्यात ठिय्या सुरू केला आहे. दोन कोटी रुपयांची खंडणी मागितल्याच्या गुन्ह्यात आरोपी असलेले वाल्मिक कराड यांच्यावर केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. हा खोटा गुन्हा असून गलिच्छ राजकारणापायी माझ्या मुलावर अन्याय केला जात आहे. त्याच्यावर दाखल केलेला खोटा गुन्हा मागे घ्या व माझ्या मुलाला न्याय द्या अशी मागणी करत वाल्मीक कराड यांच्या ७५ वर्षीय पारुबाई बाबुराव कराड या आईने सकाळपासून परळी शहर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या सुरू केला.

वाल्मीक कराड यांच्या आईने शहर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या दिल्यानंतर पोलीस ठाण्यासमोर हजारोच्या संख्येने जमाव जमा झाला.परळीच्या मध्यवर्ती असलेल्या राणी लक्ष्मीबाई टावर वर चढून वाल्मीक कराड समर्थकांनी प्रचंड घोषणाबाजी करत आंदोलन सुरू केले. तर शहरात विविध ठिकाणी चौकाचौकात जमा होत नागरिक घोषणाबाजी करत या आंदोलनाच्या समर्थनार्थ मोठ्या संख्येने समर्थक रस्त्यावर उतरल्याचे दिसुन आले.

**वाल्मीक कराड समर्थकांनी टायर पेटवत केली प्रचंड घोषणाबाजी**

खंडणी प्रकरणी आरोपी असलेले वाल्मिक कराड यांच्या आईने सकाळपासून पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले.त्यानंतर मोठ्या प्रमाणावर त्यांच्या समर्थनार्थ कराड समर्थक रस्त्यावर उतरले.परळी शहराचे मध्यवर्ती ठिकाण म्हणून ओळख असलेल्या राणी लक्ष्मीबाई टावरवर चढून कराड समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन सुरू केले. त्यानंतर मोठ्या संख्येने कराड समर्थक पोलीस ठाण्यासमोरही जमा झाले. शहराच्या विविध चौकामध्ये कराड समर्थक जमा होत जोरदार घोषणाबाजी करत वाल्मीक कराड यांना न्याय द्यावा अशा प्रकारची मागणी करून घोषणाबाजी करताना दिसून आले. या अनुषंगानेच राणी लक्ष्मीबाई टावर चौकातील आंदोलकांनी आक्रमक पवित्रा घेत या

(उर्वरीत पान २ वर)

### परळी- बीड रस्त्यावर रास्ता रोको

वाल्मीक कराड यांच्या पांगरी गावातील त्यांचे समर्थक आक्रमक झाल्याचे बघायला मिळाले.टायर जाळत परळी- बीड रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

### परळी बस स्थानकातून सुटणाऱ्या सर्व बसफेर्या बंद करण्याचा निर्णय !

खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड समर्थक परळीत आक्रमक झाल्याचे सकाळपासून दिसून येत आहे. या अनुषंगाने काहीसे तणावाचे वातावरण निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाने परळी बस स्थानकातून सुटणाऱ्या सर्व बसेस रद्द केल्या. याबाबत आगार प्रमुखांशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, बसेसची तोडफोड होऊ नये या दृष्टिकोनातून काही वेळासाठी बस बंद करण्यात आल्या होत्या. दुपारी एक ते तीन वाजेपर्यंत बीड मार्गावरील सर्व बसेस बंद ठेवण्यात आल्या होत्या. मात्र काही वेळापूर्वीच बस सुरू केल्या होत्या. परंतु परळी बंद व ठीकठिकाणी होणारे रस्ता रोको आदीच्या वृत्ताच्या अनुषंगाने वरिष्ठांनी परळी आगारातून बस सेवा बंद ठेवण्याबाबत सूचना केल्या. त्या अनुषंगाने परळीतून सुटणाऱ्या सर्व बसेस रद्द करण्यात आल्या असल्याची माहिती त्यांनी दिली.

### महिला कार्यकर्तीने केला आत्मदहनाचा प्रयत्न


पोलीस ठाण्यासमोर आंदोलन सुरू असताना या ठिकाणी मोठ्या संख्येने महिलांनीही या आंदोलनात सहभाग घेतला. या अनुषंगानेच आंदोलनात सहभागी असलेल्या एका महिलेने अंगावर पेट्रोल ओतून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. मात्र उपस्थित अन्य आंदोलनकर्ते व पोलिसांनी आत्मदहन करण्यापासून तिला परावृत्त केले. राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या शहराध्यक्ष वर्षा दहिफळे असे या आत्मदहन प्रयत्न करणाऱ्या महिला कार्यकर्तीचे नाव आहे.

### कराड समर्थक आक्रमक :अचानक काही क्षणातच परळी शहर बंद !

खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड यांच्या समर्थनार्थ परळीत सकाळपासूनच त्यांचे समर्थक आक्रमक झाल्याचे बघायला मिळाले होते. वाल्मीक कराड यांच्या आई पारुबाई कराड यांनी पोलीस ठाण्यासमोर ठिय्या सुरू केला होता. या आंदोलनाच्या समर्थनार्थ शेकडो समर्थक पोलिस ठाण्यात जमा झाले होते. या अनुषंगानेच शहरात विविध ठिकाणी घोषणाबाजी करत आंदोलने केली जात होती. एका बाजूला केज न्यायालयात वाल्मीक कराड यांना हजर केले जात असताना परळीत मात्र त्यांच्या समर्थकांनी आक्रमक पवित्रा घेत विविध प्रकारची आंदोलने केली.पोलिसांची परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मोठी तारांबळ होत असल्याचे सकाळपासूनच दिसून आले. परळी शहरात बाजारपेठेमध्ये जोरदार घोषणाबाजी करत मोटरसायकल वरून कराड समर्थक बाजारपेठ बंद करण्याचे आवाहन करताना दिसून आले.काही क्षणातच परळीची बाजारपेठ कडकडीत बंद झाली. पोलिसांनी सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त लावला असला तरी परळी शहरात काहीसे तणावाचे वातावरण निर्माण झालेले आहे.

### परळी -कौडगाव कानडी बसवर दगडफेक!

परळी- कौडगाव कानडी या बसवर अज्ञात लोकांनी दगडफेक केल्याची घटना घडली.परळी तालुक्यात काही ठिकाणी रस्ता रोकोचाही प्रकार समोर आला. त्यानंतर एसटी महामंडळाने बस फेऱ्या रद्द करण्याचा निर्णय घेतला. परळी- कौडगाव कानडी या बसवर अज्ञात लोकांनी दगडफेक केल्याची घटनाही पुढे आली .

## श्रीगणेश जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

शहरातील श्री गणपती मंदिर ट्रस्ट, चौभारा यांच्याकडून दरवर्षी प्रमाणेच याही वर्षी श्रीगणेश जयंतीनिमित्त विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यात गणेशयाग पालखी सोहळा काढण्यात येणार असून भाविक भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे.

श्री गणपती मंदिर ट्रस्ट, चौभारा यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणेच याही वर्षी श्रीगणेश

(उर्वरीत पान २ वर)

## खंडणी प्रकरणी वाल्मीक कराड वर मकोका

### सीआयडी ने मागितली दहा दिवसाची सीआयडी कोठडी,न्यायालयाने दिली न्यायालयीन कोठडी, आज केज न्यायालयात हजर करणार




केज/प्रतिनिधी

मस्साजोग येथील खंडणी प्रकरणा बाबत वाल्मिक कराड यांना मंगळवारी केज न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी केज न्यायालयाने महत्वपूर्ण निर्णय दिला आहे.वाल्मिक कराड वर आता सीआयडीने मकोका लावला आहे. कराडला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. अवादा एनर्जी या कंपनीला दोन कोटी रुपयांची खंडणी मागितल्या प्रकरणी अटकेत असलेल्या वाल्मिक कराड ला केज न्यायालयाने १४दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.सीआयडी ने वाढीव दहा दिवसांची सीआयडी कोठडी मागितली होती.मात्र आरोपीच्या वकिलाने तपास पूर्ण झाल्याने वाढीव कोठडीची गरज नाही असा युक्तीवाद केला.त्यावर न्यायालयाने हा निर्णय दिला.वाल्मिक कराडच्या संपत्तीबद्दल सरकारी वकिलांनी

(उर्वरीत पान २ वर)

## रस्त्यासाठी सुनील कावळे २६ जानेवारी रोजी करणार नगरपरिषद कार्यालयासमोर उपोषण

धारूर ।प्रतिनिधी

शहरातील नगरपरिषद हद्दीतील गायकवाड गल्ली येथील रस्ते दुरुस्ती करण्याची मागणी मान्य होत नसल्याने दि.२६ जानेवारी रोजी सुनील कावळे सह येथील नागरिक नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार आहेत तसे निवेदन नगर परिषदेला देण्यात आले आहे.

(उर्वरीत पान २ वर)

शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
ॲडव्हान्स ॲनोरेक्टल (पाईल्स) लेझर सेंटर
डॉ. प्रशांत श.ढाकणे
M.B.B.S., M.D. (Anaesthesia)
भुलतज्ञ
डॉ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)
B.A.M.S., M.S. (Shalya)
मुळव्याध, भगंदर व लेबर सर्जन
आपल्या बीड शहरामध्ये प्रथमच..... महिला मुळव्याध तज्ञ
डॉ. सौ. मीरा प्र. ढाकणे (नागरे) महिला रुग्णांच्या तपासणी करीता उपलब्ध राहतील
मुळव्याध करीता विशेष उपचार
* लेजर उपचार
* इंजेक्शन उपचार
* ऑपरेशन उपचार
* क्षारसुत्र उपचार,
* मुळव्याध, भगंदर
* फिशर, मलबध्दता
* संडासवाटे रक्तस्त्राव होणे.
* बस्ती उपचार
* स्तनातील गाठी
* शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठी
* स्तनामध्ये पु होणे.
* मोस, जामखीळ व कुरुप काढणे
* गर्भावस्था किवा प्रसुतीनंतर
* मुळव्याध करीता विशेष आयुर्वेद उपचार
हॉस्पीटलचा पत्ताशिवसमर्थ मुळव्याध हॉस्पीटल साई कॉम्पलेक्स, आदर्श नगर, डि.पी.. रोड बसस्टॅन्डच्या पाठीमागे, डॉक्टर लाईन, बीड मो.क्र.9623079009

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

संपादकीय

# महाकुंभाचे महाभारत

प्रयागराज येथे सुरू झालेला कुंभमेळा म्हणजेच महाकुंभ आजवरचा जगातला सर्वांत मोठा धार्मिक, सांस्कृतिक उत्सव होणार आहे. आज मकरसंक्रातीच्या मुहूर्तावर निदान एक कोटी भाविक अमृत स्नान करतील, अशी अपेक्षा आहे.

प्रयागराज येथे सुरू झालेला कुंभमेळा म्हणजेच महाकुंभ आजवरचा जगातला सर्वांत मोठा धार्मिक, सांस्कृतिक उत्सव होणार आहे. आज मकरसंक्रातीच्या मुहूर्तावर निदान एक कोटी भाविक अमृत स्नान करतील, अशी अपेक्षा आहे. सोमवारीच स्नान केलेल्या भाविकांची संख्या साठ लाखांच्या वर गेली होती. हा संपूर्ण सोहळा आता सलग ४५ दिवस म्हणजे २८ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. या काळात तीन दिवस विशेष पवित्र म्हणजे अमृत स्नानाचे आहेत.

अनेक आखाड्यांच्या शाही मिरवणुका आणि त्यांचा मान यांच्यामुळे या स्नानांना 'शाही स्नान' असे म्हणण्याची प्रथा पडली आहे. यंदा उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व आयोजन जास्तीत जास्त सुरळीत व्हावे, यासाठी कंबर कसली आहे. गेली तीन वर्षे या उत्सवाची तयारी विविध पातळीवर चालू आहे. यंदाचा महाकुंभ सुफळ संपूर्ण होईल, तोवर प्रयागराजमध्ये येणाऱ्या एकूण भाविकांची संख्या ४० कोटींच्या घरात जाऊ शकते. हा आकडा कल्पनेच्या पलीकडे मोठा आहे. जवळपास १८३ देशांमधील भाविकांनी कुंभमेळ्याची वेबसाइट पाहून यात सहभागी होण्याचा विचार चालविला आहे. विविध देशांमधील हजारो भारतीय, तसेच अभारतीय या आधीच भारतात आले असून हा आकडा महिन्याभरात काही लाखांपर्यंत जाईल.

इतके भाविक येणार असल्याने असंख्य प्रकारच्या यंत्रणा व व्यवस्था उभ्या कराव्या लागल्या आहेत. उत्तर प्रदेश सरकार काही हजार कोटी या महाकुंभाच्या आयोजनासाठी खर्च करीत आहे. शिवाय, केंद्र सरकारने विशेष अनुदान दिले आहे. महाकुंभ ही जशी धार्मिक आघाडीवरची महाघटना आहे; तशीच ती आर्थिक आघाडीवरची महाघडामोड होणार, हेही स्पष्ट आहे. काही तज्ज्ञ आणि संस्थांच्या मते या काळात किमान दोन लाख कोटी रुपयांची उलाढाल होईल, असा अंदाज आहे. ही मोठी उलाढाल अर्थकारणाला, तसेच रोजगार निर्मितीला चालना देणारी आहे. महाकुंभाच्या निमित्ताने याआधीच कित्येक हजार रोजगार निर्माण झाले आहेत. हा आकडा वाढणार आहे. देशात धार्मिक उत्सवांमध्ये होणारी चेंगराचेंगरी आणि भाविकांचे बळी यांचा इतिहासच आहे. सन १९५४ मध्ये कुंभमेळ्यात आठशे भाविकांचा प्राण गेला होता. त्यानंतरही अशा घटना घडत आल्या आहेत. यंदा हे टळावे म्हणून कृत्रिम प्रज्ञेची म्हणजे एआयची तर मदत घेण्यात आली आहेच; पण योगी सरकारने सप्त-स्तरीय संरक्षण यंत्रणा उभारली आहे. या बाबी यंदा कशा यशस्वी ठरतात, यावर पुढच्या धार्मिक आयोजनांना नवी दिशा मिळणार आहे.

---

**मा.श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश**
**क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक :- ४१ / २०२५**
**( मार्फत विधिज्ञ:- श्री जे. डी. पांडव)**

**अर्जदार :-**
**१.विदयासागर पि. जनार्दन पाटंगणकर, वय ६७ वर्षे धंदा-सेवानिवृत्त, रा. वरचे पाटंगण, जुने तहसील ऑफीस जवळ, पाटंगण गल्ली, बीड, ता. जि. बीड.**
**२. अभिनंदन पि. जनार्दन पाटंगणकर, वय ६४ वर्षे, धंदा-सेवानिवृत्त, रा. वरीलप्रमाणे,**
**३. अनुजा गजानन रुईकर, वय-७९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. माळीवेस, कोतवाल गल्ली, बीड, ता.जि. बीड.**
**४. सिंधू पि. जनार्दन पाटंगणकर, वय ६० वर्षे, धंदा -घरकाम, रा. वरचे पाटंगण, जुने तहसील ऑफीस जवळ, पाटंगण गल्ली, बीड, ता. जि. बीड,**
**५.श्रीमती सुनीती भ्र. सुरेश मंगीराज, वय-८२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. यशवंत नगर, पैठण, ता. पैठण, जि. औरंगाबाद,**
**६.सौ. सुनंदा भ्र. खंडेराव कसरेकर (मयत )**
**६.१. सुमेधा भ्र. रोहन खेडके, वय-४२ वर्षे, धंदा-घरकाम रा. ११६/११/११-१००३, अनंत व्यंकटेश, बालाजी मंदीराजवळ, पाशान, पुणे शहर, पुणे.**
**६.२.प्रियंका निलेश दाभाडे, वय ४० वर्षे, धंदा-घरकाम, रा. फलॅट नं.७. नटराज हाईटस, चेतना नगर, कृष्ण मंदीराजवळ, राणे नगर, सिडको कॉलनी, नाशिक**
**७. श्रीमती शैलजा भ्र. वेदकुमार वैदय, वय ७२ वर्षे धंदा रा. हनुमान मंदिराच्या पाठीमागे, चाणक्यपुरी, बीड, ता.जि. बीड.**
**८.श्यामा भ्र. चातक देशपांडे, वय-६९ वर्षे, रा. मियामी सी-२-१०४ सिंहगड रोड, वडगांव खुर्द, पुणे शहर, ता. जि. पुणे.**

विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नामे जनार्दनबुवा रघुनाथबुवा पाटंगणकर हे दि. २४/०१/२०१२ रोजी बीड, ता. जि. बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ व २ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क. ३,५,७ व ८ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. अर्जदार क ४ या अविवाहीत आहेत. अर्जदार क ६ या मयताच्या विवाहीत मुलगी आहे, परंतु त्यांचेही निधन झाल्याने त्यांचे वारस विवाहीत मूली अर्जदार क ६.१ व ६.२ अशा आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- ०९/०१/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
पुढील तारीख:- १८/०२/२०२५
आदेशावरुन.

**अधिक्षक,**
**स्वाक्षरित/-**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड**

---

# अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेचे देशातील विविध मान्यवरांना समाजभूषण पुरस्कार प्रदान

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या वतीने देशातील विविध क्षेत्रातील विविध नामवंत मान्यवरांना समाजभूषण पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून देशाचे ऊर्जा राज्यमंत्री नामदार श्रीपाद नाईक, तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदी महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल हे होते. महासभेचे नवनियुक्त अध्यक्ष राजकिशोर मोदी, माजी मंत्री प्रकाश चौधरी, प्रदीप जयस्वाल, सुरेंद्रपाल अहलुवालिया, राजा चौधरी, आमदार श्रीमती अनुपमा जयस्वाल, अटल गुप्ता, अर्चना जयस्वाल, कुमार गौड, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या पुरस्काराचे वितरण अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या दहाव्या राष्ट्रीय महा अधिवेशना दरम्यान वितरित करण्यात आले.

महासभेच्या वतीने पुरस्कार प्रदान करण्यात आलेल्या देशभरातील मान्यवारांमध्ये प्रामुख्याने आमदार प्रदीप शिवनारायन जायसवाल (छत्रपती संभाजीनगर), माजी आमदार तथा माजी राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश नाथुलालजी चौधरी ,(बडी सादडी जिल्हा चितोडगड , राजस्थान), प्रदीपकुमार धिरजलालजी जायसवाल (बडोदा ,गुजरात), जेष्ठ समाजसेवक भरतलाल बाबूलालजी जायसवाल (इंदोर, मध्यप्रदेश), जेष्ठ समाजसेवक ईश्वरचंदजी रामकांतजी साव (मुंबई, महाराष्ट्र) , बी मधूसुदनजी जायसवाल (हैदराबाद ,तेलंगाणा) , लक्ष्मी नारायण परमेश्वर जायसवाल (अकोला महाराष्ट्र) यांचा समावेश होता. याप्रसंगी संयोजक तथा २०२५-२०२८ चे नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी पुरस्कार प्राप्त सर्व मान्यवांचे अभिनंदन करत त्यांनी केलेल्या समाजकार्याचा उहापोह केला. महासभेच्या वतीने पुरस्कारासाठी व्यक्ती निवडतांना देशातील सर्व भागातील समाज बांधवांना समावेशीत करण्याचा प्रयत्न केला गेला असल्याचे सांगितले. त्याचबरोबर महासभेच्या सर्वोच्च अशा पदासाठी माझ्यासारख्या एक सामान्य कार्यकर्त्यावर विश्वास टाकून माझी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड केली त्याबद्दल मी सर्व समाजबांधव तथा सर्ववर्गीय महासभेच्या सदैव ऋणात राहण्याचा प्रयत्न करून यापुढे समाजास एकसंघ करून त्यास पुढे नेण्याचा प्रयत्न करेन अशी भावना राजकिशोर मोदी यांनी या कार्यक्रम प्रसंगी व्यक्त केली.प्रमुख पाहुणे देशाचे ऊर्जा राज्यमंत्री नामदार श्रीपाद नाईक यांनी देखील सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे अभिनंदन केले. संयोजकांनी पुरस्काराला साजेशा व्यक्तींचीच निवड करून त्या पुरस्काराची उंची वाढवल्याचे मत यावेळी नमूद केले. देशभरात बहुतांश ठिकाणी विखुरलेल्या समाजास



या अधिवेशनप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी एकत्र आणल्याबद्दल त्याचे कौतुक केले. त्याचबरोबर मोदी हे त्याच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या कार्य काळात समाजाच्या विविध प्रश्नांची उकल महासभेच्या वतीने करतील अशी अपेक्षा देखील नाईक यांनी व्यक्त केली. दिलेल्या पुरस्काराने त्या त्या व्यक्तीची सामाजिक जवाबदारी वाढल्या जाऊन पुन्हा त्यांना आपले सामाजिक कार्य जोमाने पुढे न्यावे लागणार असल्याने या समाजभूषण कार्यक्रम प्रसंगी नमूद केले. अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जयसवाल यांनी निवड

झालेल्या या सर्व मान्यवरांनी देशभरात केलेल्या सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन त्यांना जायसवाल महासभेच्या वतीने समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या समाजभूषण पुरस्काराचा वितरण सोहळा रविवार दि १२ रोजी मोदी लर्निंग सेंटर येथे संपन्न झाला.

---

# शिक्षण हे मानवाच्या प्रगतीचे साधन : प्रा.गौतम गायकवाड

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

शिक्षण हे मानवाच्या प्रगतीचे साधन आहे. शिक्षणातून चारित्रसंपन्न नागरिक घडावा. शिक्षक हा देशाच्या रथाचा चालक आहे. तो कोणत्याही काळात आदर्शच आसतो असे विचार प्रा. गौतम गायकवाड यांनी मांडले. ते येथील खोलेश्वर महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनाच्या निमित्ताने ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार या विषयावर बोलत होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून भा.शि.प्र. संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी हे होते. विचारमंचावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दीपक फुलारी, उपप्राचार्य डॉ. बिभिषण फड , उपप्राचार्य प्रा. आनंद पाठक , प्रा.सतीश हिवरेकर हे उपस्थित होते. प्रा.गायकवाड पुढे बोलताना म्हणाले की, माणूस घडविण्याचे साधन शिक्षक आहे. माणसाचे चारित्र शुध्द असणे महत्वाचे आहे. शिक्षक देशाच्या रथाचे चालक आहेत. ते कोणत्याही काळात आदर्श आसतात. ते समाजाच्या व देशाच्या कल्याणासाठी कार्यरत राहीले पाहिजेत तसेच शिक्षणाचे खाजगीकरण होऊ नये. शिक्षण हे शासनाच्या हाती असले पाहिजे. कालसुसंगत शिक्षण देणे आवश्यक आहे.कोणत्याही देशात शिक्षण व आरोग्याचे खाजगीकरण होऊ नये, तसे झाले तर देश मरतो, तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील शिक्षक, संस्थाचालक यांची कर्तव्य ही त्यांनी विषद केली.




अध्यक्षीय समारोप करतांना राम कुलकर्णी म्हणाले की, आजचा दिवस मकरसंक्रांतीचा शुभ दिन आहे. या दिनी माणसाच्या मनाचे संक्रमण झाले पाहिजे. मनात एकमेकांबद्दल गोडवा निर्माण झाला पाहिजे. झोपडीतील माणसाला शिक्षण मिळाले पाहिजे. प्रत्येक माणूस ज्ञानी झाला पाहिजे. शिक्षणामुळे माणसाचा सर्वांगिण विकास होतो. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. म्हणून समाजाला मार्गदर्शन करणारा शिक्षक आहे. त्यांच्याकडून स्वत:सोबत समाजाची, देशाची उन्नती अपेक्षीत आहे. बाबासाहेब आंबेडकर जन्माला आले म्हणून झोपडीतील माणसासाठी शिक्षणाची दारे उघडली व त्यांचा उत्कर्ष झाला, म्हणून बाबासाहेबांचा आदर्श घेऊन आपण आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जिजाराम कावळे यांनी केले , आभार प्रा. अजय डुबे यांनी मानले तर विद्यापीठ गीत प्रा.शैलेश पुराणिक यांनी सादर केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---



# शिरूर तालुक्यातील महिलांनी केली मकर संक्रांति साजरी!

शिरूर (प्रतिनिधी)

महिलांच्या आवडता सण म्हणजे मकर संक्रात या दिवशी सर्व महिला स्थानिक देव देवीताना अनवाणी सामूहिक पणे दर्शनाचा लाभ घेत असतात प्रामुख्याने महिला दिवसभर उपवास करून आपल्या मनोकामना पूर्ण होण्यासाठी देवाकडे प्रार्थना करत असतात या दिवशी एकमेकींना हळदी कुंकू लावणे तिळगुळ देऊन गोड गोड बोला एक दिवस भोगी व दुसऱ्या दिवशी मकरसंक्रात असे क्रम असून यानंतर जवळपास १५ ते २० दिवस एकमेकींच्या घरी जाऊन मकर संक्रात एकमेकांना भेटवस्तू हळदीकुंकू देऊन साजरी करण्यात येते मंगळवार (दि.१४) पासून या पुढील पंधरा दिवस हा महिलांचा दिनक्रम दररोज पहावयास मिळत असतो या दिवशी सर्व महिला मोठ्या प्रमाणावर आनंद उत्सवाने हा सण हसतमुखाने साजरा करत असतात. शहरातील महिला ग्रामदैवत कालिका देवी, गणपती मंदिर, मारुती मंदिर, विठ्ठल रखुमाई मंदिर, सिद्धेश्वर मंदिर, स्वामी समर्थ मंदिर, दत्त मंदिर आदी ठिकाणी ववसण्याची वेळ सकाळी ९ ,ते ५ वाजेपर्यंत कार्यक्रम महिलानी केला आहे.

---

# एकाग्रतेतून आनंदासाठी विज्ञानाची गरज - जेष्ठराज जोशी

## मराठी विज्ञान परिषदेच्या अंबाजोगाई शाखेचे उद्घाटन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

एकाग्रतेतून आनंद निर्माण होण्यासाठी विज्ञानाची गरज असुन जीवन जगताना याच जिज्ञासेतून यशस्वी होता येते असे मत मुंबई येथील मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष तथा आय.सी.टी.चे कुलपती पद्मभूषण जेष्ठराज जोशी व्यक्त केले. ते योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित पू. बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्रामार्फत मराठी विज्ञान परिषदेच्या अंबाजोगाई शाखा उद्घाटन प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाळे होते.प्रमुख पाहूणे म्हणून मराठी विज्ञान परिषदेचे सचिव श्री.अ.पां.देशपांडे तर मंचावर संभाजीनगर च्या मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष डॉ. रंजन गर्गे,मराठी विज्ञान परिषदेच्या सोलापूर शाखेचे अध्यक्ष डॉ.व्यंकटेश गंभीर, मराठी विज्ञान परिषदेचे व्यवस्थापकीय संचालक राजेश समेळ,योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, कार्यकारी उपाध्यक्ष ऍड.जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर, सहसचिव प्रा. भीमाशंकर शेटे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना मा.जेष्ठराज जोशी म्हणाले की,विज्ञानाच्या माध्यमातून विविध शोध लागले त्यामुळे मानवी जीवन आनंददायी आहे पुढील काळातही वैज्ञानिकांच्या संशोधकातून विविध शोधांची निर्मिती होईल असे सांगून त्यांनी शास्त्रज्ञ मायकेल फॅरॅडे यांचे संशोधन व सभोवतालची प्रतिकूल परिस्थिती याचा संदर्भ देऊन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या विश्वात नेले. श्री.अ.पां.देशपांडे म्हणाले की, कोणत्याही गोष्टीसाठी सातत्याने प्रयत्न आवश्यक असतात मगच ती गोष्ट साध्य होते.संशोधन करण्यासाठी सुविधांची आवश्यकता नसते यश अपयश ह्या गोष्टी परिस्थितीपूरक नसतात त्या कष्टाने साध्य करता येतात असेही त्यांनी सांगितले. डॉ.रंजन गर्गे,डॉ.व्यंकटेश गंभीर यांनीही मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणा सोबतच वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासून विज्ञान प्रयोग निरीक्षण, आवड निर्माण केली पाहीजे असे मत अध्यक्षीय समारोपात डॉ.सुरेश खुरसाळे यांनी व्यक्त केले.

उपस्थित पाहुण्यांचे स्वागत पू.बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्रांच्या वतीने करण्यात आले. संस्थागीत,विज्ञान गीताने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. या निमित्त्याने आयोजित केलेल्या




विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन व वृक्षारोपण मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी संस्थेतील विज्ञान विषयक उपक्रमांची माहिती दिली. संचालन प्रा.डॉ.संदीप काळे यांनी तर उपस्थितांचे आभार हेमंत धानोरकर यांनी मानले. या कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, संचालक ,प्राध्यापक , शिक्षक,शिक्षिका,कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

पान १ वरुन...

**परळीत तणाव....**

ठिकाणी टायर जाळून घोषणाबाजी केली.परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी शहरात ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. राणी लक्ष्मीबाई टॉवर चौकात पोलिसांनी मध्यस्थी करत आक्रमक झालेल्या कराड समर्थकांना शांत केले.या ठिकाणी जाळण्यात आलेले टायरही विझवून टाकण्यात आले.

समर्थक आक्रमक: मनोज जरांगे,सुरेश धस,अंजली दमानिया, जितेंद्र आव्हाड व संदीप क्षीरसागर यांच्या प्रतिमांना मारले जोडे

मस्साजोग खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड यांच्या आईने सकाळपासून परळी पोलीस ठाण्यासमोर ठिय्या धरल्यानंतर या ठिय्या आंदोलनाच्या समर्थनात परळी व तालुक्यातील विविध गावातून कराड समर्थक मोठ्या संख्येने परळी शहरात दाखल झाले.पोलीस ठाण्यासमोर कराड समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी करत मोठा जमाव या ठिकाणी जमा झाला. या ठिकाणची गर्दी सातत्याने वाढताना दिसत होती. मोठ्या संख्येने महिलाही या ठिकाणी आंदोलनात सहभागी झाल्या. तर दुसरीकडे शहरातील विविध चौकांमध्येही कराड समर्थक जोरदार घोषणाबाजी करत आक्रमक आंदोलन करताना दिसले. पोलीस ठाण्यासमोर जमा झालेल्या कराड समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी केली. या आंदोलन स्थळी सहभागी कराड समर्थक महिलांनी आमदार सुरेश धस,अंजली दमानिया, जितेंद्र आव्हाड व आमदार संदीप क्षीरसागर यांच्या विरुद्ध जोरदार घोषणा देत त्यांच्या प्रतिमांना चपला मारून जोडे मारो आंदोलन केले.

**खंडणी प्रकरणी वाल्मीक....**

कोर्टाला अवगत केले . वाल्मिक कराड ची मोठ्या प्रमाणावर संपत्ती असल्याची माहिती मिळत असून ही संपत्ती भारता बाहेर ही असू शकते असा युक्तिवाद करण्यात

पान १ वरुन...

आला.त्यामुळे त्याला खंडणीच्या प्रकरणात आणखी १० दिवसाची सीआयडी कोठडी मागण्यात आलेली होती.सरकारी वकील शिंदे हे सरकारी पक्षाची बाजू मांडत आहेत.तर वकील सिद्धेश्वर ठोंबरे हे वाल्मिक कराडची बाजू केज कोर्टामध्ये मांडत आहेत.सरकारी पक्षाच्या

वतीने दहा दिवसांची सीआयडी कोठडी मागितली.यापूर्वीवाल्मिक कराड ला १४ दिवसांची कोठडी मिळाली होती. दरम्यान दि.१२ डिसेंबर २०२४ पासून फरार असलेला वाल्मिक कराड दि.३१ डिसेंबर २०२४ रोजी पुण्यात सीआयडी कार्यालयात शरण आला होता.त्यानंतर त्याला फरार होण्यासाठी मदत करणाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी होत आहे.एवढेच नाही तर खुद्द धनंजय मुंडेंच्या बंगल्यावर पोलिसांसोबत बैठक झाल्यानंतरच वाल्मिक कराड फरार झाला होता असा आरोप खा.बजरंग सोनवणे यांनी केला आहे.खंडणीच्या प्रकरणात सीआयडी ने वाल्मिक कराड च्या आवाजाचे नमुने घेतले आहेत.ते नमुने आवादा कंपनीचे सुपरवायझर शिंदे यांच्या आवाजाशी मिळतात काय हे पहाणे महत्त्वाचे ठरणार आहे. कारण शिंदेंच्या मोबाईल मधून मोबाईल कॉल डेटा सीआयडीला मिळालेला आहे.मात्र विष्णू चाटेचा मोबाईल सीआयडी ला मिळालेला नाही.शेवटी वाल्मीक कराड ला न्यायालयीन कोठडी मिळाली आहे.दरम्यान वाल्मीक कराड ला आज केज न्यायालयात आणणार असल्याची माहीती मिळत आहे.

**श्रीगणेश जयंतीनिमित्त....**

जयंतीनिमित्त १ फेब्रुवारी २०२५ रोजी विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. याच्या नियोजनासाठी रविवार रोजी ट्रस्टचे पदाधिकारी व भाविक भक्त यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी झालेल्या व्यापक आणि सकारात्मक चर्चेतून श्रीगणेशयाग पालखी सोहळा साजरा करणे व भाविक भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यासंदर्भात सर्वानुमते

पान १ वरुन...

ठरले. ज्यात कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विविध जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले. या बैठकीस शिरीष भावठाणकर, विजयराव उमणवार, शंकरराव भावठाणकर, सतिश राऊत, भागवतराव देवशटवार, नंदकिशोर देशमाने, भिमाशंकर राऊत, प्रभाकर देशमाने, दयानंद दगडू राऊत, माऊली सातभाई, शंभुलिंग राऊत, संगम देवशटवार, दयानंद राऊत, बालाजी कोंडेकर, अमोल राऊत, राम घोडके, अतुल राऊत, सुहास सातभाई, शिवलिंग राऊत, शंकर सातभाई, नागेश्वर राऊत, संकेत झरकर, ओमकार धोत्रे, राहुल भावठाणकर, संदीप भावठाणकर, शुभम भावठाणकर, महेश राऊत, बालाजी राऊत, गोविंद राऊत, विलास जिरे, कृष्णा घोडके, संतोष घोडके, गजानन घोडके, अनंत घोडके, अभिजीत राऊत, अनिकेत राऊत, नितीन जिरे, योगेश कातळे, रमेश देशमाने, चंद्रकांत देशमाने, उमाकांत देशमाने, संदीप देशमाने, प्रसाद देशमाने, बाळकृष्ण देशमाने, विमलनाथ कोंडेकर, वैजनाथ जाधव, गणेश जाधव, विष्णू जाधव, पप्पू सातभाई, गजानन भावठाणकर, विशाल कंठीकर आदींसह गणेश भक्तांची उपस्थिती होती.

**रस्त्यासाठी सुनील कावळे ...**

किल्ले धारूर नगरपरिषदे अंतर्गत गायकवाड गल्ली भाग येतो या भागातील अनेक ठिकाणच्या रस्त्याची दयनीय अवस्था झालेली आहे यासंदर्भात नगरपरिषद प्रशासनाला निवेदनाद्वारे कळून रस्त्याची झाली दुरवस्था दुरुस्ती करण्याची मागणी केली होती मात्र त्या मागणीची कसलीही दखल नगर परिषद प्रशासनाने घेतली नाही त्यामुळे पुन्हा दि.१४ जानेवारी रोजी निवेदन देऊन रस्ता दुरुस्ती करण्याची मागणी केलेली आहे या मागणीची दखल दि.२५ जानेवारीपर्यंत पूर्ण न केल्यास दि.२६ जानेवारीपासून नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा दिलेल्या निवेदनात करण्यात आला आहे या निवेदनावर सुनील कावळे सह नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शासनाने काढलेल्या आयुष्यमान भारत आरोग्य मंदिरचा दवाखाना नियमबाह्य चालवून शासनाची केली फसवणूक

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

आयुष्यमान आरोग्य मंदिर. म्हणजेच आपला दवाखाना सदरील दवाखाना... शासनाचा उद्देश स्लम एरिया झोपडपट्टी येथे हा दवाखाना असावा. असा नियम आहे. असे पाच दवाखाने अंबाजोगाई शहरात सुरू होऊन एक वर्ष झाले आहे. दवाखाना दुपारी दोन ते संध्याकाळी दहापर्यंत सुरू असावा असाही नियम आहे. सदरील दवाखान्यात एक डॉक्टर, एक नर्स, दोन सफाई कामगार ,व एक फार्मसी व्यक्ती नेमणूक करण्यात आलेली आहे. व उपचार असा आहे गरोदर महिला. बी.पी. शुगर ,नाकाचे , कानाचे ,आजार व इतर आजार जाग्यावर निदान करून एकही रुपया न घेता औषधी देणे. स्वयं आहे. स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात डुप्लिकेट औषधी आल्यामुळे याचा विचार करता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अंबाजोगाई शहरातल्या पाच दवाखान्यात भरपूर प्रमाणात औषधी साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. अपघात झालेल्या व्यक्तीला प्रथम उपचार देणे व परिस्थिती आटोक्याबाहेर असल्यास म्बुलन्स द्वारे १०८ नंबर कोणत्याही प्रकारचा शुल्क न घेता लोखंडी सावरगाव दवाखाना येथे विचार करण्यास प्रधान देणे. उद्देश व नियम आहे. हा दवाखाना क्रांतीनगर लालनगर येथे असावा व सदरील दवाखाना जागेसाठी घराचा शुल्क शासनाने तब्बल १२ लाख रुपये पाच वर्षाचे ठरविण्यात आले आहे. परंतु नियमाला केराची टोपली दाखवत बारा लाख रुपयाचे मानधन शासनातर्फे मिळत आल्यामुळे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मित्र व आपल्या नातेवाईकाला हा दवाखाना नियमबाह्य क्रांती नगर, लाल नगरचा दवाखाना रोहिदास नगर चनई येथे तब्बल सात किलोमीटर बाहेर रोहिदास नगर येथे क्रांतीनगरचा दवाखाना नियमबाह्य बारा




लाखच्या लालच पोटी रोहिदास नगर चनई येथे सुरू करण्यात आला. क्रांती नगरच्या लोकांना माहित सुद्धा नाही की आपला दवाखाना हक्काचा चनई येथे चालू आहे. सदरील दवाखान्यात रुग्ण ना जाण्यासाठी तब्बल सात किलोमीटर लांबून जावे लागते याचे कारण वैद्यकीय महाविद्यालय स्वामी रामानंद येथून जागा जाण्या अधिष्ठाता साहेबांनी ठेवलेली नाही. आपला दवाखान्यात रुग्ण येत नसल्यामुळे सर्व रुग्णांना कोणता तरी उपचार चालू आहे असे दाखविण्यासाठी चक्क अंगणवाडी सेविका तर्फे काम करून घेतला जातो व गोळ्या औषधी दिले असे रजिस्टरला रुग्ण न येता नोंद केली सुद्धा जाते डॉक्टरांचा सगळा काम अंगणवाडी सेविका करत. सामान्य जनतेला हा दवाखान्याचा लाभ न मिळाल्य चा दवाखान्याची जागा क्रांतीनगरला उपलब्ध नाही व कोणीही दवाखान्यात जागा किरायाने देण्यास तयार नाही .असा दिशाभूल करणारा पत्र तयार करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना आपल्या घरात बारा लाख रुपयांची सुविधा होण्यासाठी हा दवाखाना स्वतःच्या घरात सुरू करण्यात आल्यामुळे आजपर्यंत सामान्य जनतेला या दवाखान्याचा लाभ मिळालेला नाही. हा प्रकार नियमबाह्य वरिष्ठ अधिकारी गेल्या वीस वर्षापासून अंबाजोगाई शहरात स्थायिक असल्यामुळे घडून आलेला आहे. वीस वर्षात फक्त अंबाजोगाई बदली करून दोनच अधिकारी या पदावर उपभोग घेतात परंतु हे नियमबाह्य आहे. सदरील अधिकाऱ्यांनी पाच वर्षाचे एग्रीमेंट १२ लाख चा असल्यामुळे तब्बल पाच वर्ष सामान्य जनतेला कधीच या दवाखान्याचा लाभ मिळणार नाही हे मात्र खरे. तरी कळकळीची विनंती प्रत्येक समाजसेवकाने आपल्या गल्लीचा हक्काचा दवाखाना शोधून काढावा.आणि सामान्य जनतेला लाभ द्यावा.. मानव सेवा हीच ईश्वर सेवा..




## थेरगाव येथे शिवाजी बाबासाहेब वाचनालयात महाराष्ट्र शासनाने दिलेला विद्यार्थी व विद्यार्थिनी वाचन संकल्प उपक्रम राबवण्यात आला

जालना ।प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे थेरगाव येथील शिवाजी बाबासाहेब सार्वजनिक वाचनालय येथे महाराष्ट्र शासनाने दिलेला विद्यार्थी

व विद्यार्थिनी वाचन संकल्प उपक्रम राबवण्यात आला आहे.यावेळी जी.एस.गाडेकर अध्यक्ष, उपसरपंच गणेश देविदास अनपट, शिवसेना प्रमुख बबनजी अनपट, वाल्मीक अनपट,माजी सरपंच विष्णू म्हस्के,आचुत म्हस्के, सर्व सदस्य व कर्मचारी विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे रब्बी हंगाम खत टंचाई संदर्भात

## खा.डॉ.कल्याणरावजी काळे यांच्या उपस्थितीत आढावा बैठक संपन्न

जालना ।प्रतिनिधी

दि.१३ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे खासदार डॉ.कल्यणरावजी काळे यांच्या उपस्थितीत रब्बी हंगाम खत टंचाई च्या संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली.सदर बैठकीत शेतकरी,कृषि निविष्ठा विक्रेते, शेतकरी संघटना यांच्या अडचणी व समस्यांबाबत चर्चा करून त्यावर उचित कार्यवाही करण्याच्या सूचना खासदार डॉ.कल्याणरावजी काळे यांनी दिल्या आहेत.तसेच खत कंपनीने लिंकिंग करु नये या बैठकीत उपस्थित खत कंपन्याचे प्रतिनिधी यांनाही सूचना देण्यात आल्या आहेत.सर्व घाऊक व किरकोळ विक्रेता यांनी देखील कंपन्यांकडून लिंकिंग बाबत विरोध करून ठोस




भूमिका घेण्याची सूचना कृषि निविष्ठा विक्रेता संघटना यांना ही केली आहे.यावेळी जिल्ह्याच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीमती रिता मेत्रेवार, निवासी जिल्हाधिकारी श्री.महाडिक , जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री.गहिनीनाथ कापसे, कृषि विकास अधिकारी श्री.प्रभाकर बनसावडे, मोहीम अधिकारी श्री.निलेशकुमार मदाने व कृषि विभागातील सर्व अधिकारी,खत कंपनीचे प्रतिनिधी,खत विक्रेता प्रतिनिधी, पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागनाथ देवस्थान मानूर येथे अखंड शिवनाम सप्ताहाची सांगता

मानूर / शाहेबाज पठाण

प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनामध्ये अनेक गोष्टी दान कराव्या लागतात आणि ते दान केल्यानंतर पुण्य प्राप्त होत असते. हेच दान अनेक पटीने करायचे असेल तर त्याव्यक्तीला मठसंस्थान किंवा गुरुस्थानाच्या ठिकाणी दान करावे लागते. त्यावेळी त्याचे पुण्य कैकपटीने फळास प्राप्त होते. असे प्रतिपादन श्री ष ब्र १०८ गुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज यांनी मानूरमधील सप्ताह सांगता प्रसंगी केले. श्रीमद् वीरसिंहासनाधीश्वर रेणुकशाखीय वीरगोत्रिय श्री नागनाथ देवस्थान जहागीरदार मठसंस्थान मानूरचे लिंगैक्य श्री ष ब्र १०८ गुरु विरूपाक्ष शिवाचार्य महाराज यांचे १९ वे पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त श्री तीर्थक्षेत्र नागनाथ देवस्थान जहागीरदार मठसंस्थान मानूर येथे अखंड शिवनाम सप्ताह,ग्रंथराज परमरहस्य पारायण व नित्य लघुरुद्राभिषेक सोहळा हा शनिवार दिनांक ४ ते ११ जानेवारी २०२५ या कालावधी संपन्न झाला. या



सप्ताहाची सुरुवात लिंगैक्य श्री श्री गुरुगिरी शिवाचार्य मानूरकर महाराज यांनी २००८ या सालापासून सर्व शिष्य व सद्भक्तांच्या सहभागातून सुरू केलेला हा सप्ताहास असून गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्र सह बाहेरील राज्यातून बिहार, गुजरात, कर्नाटक यासह अनेक राज्यातून शिष्य व सद्भक्त मंडळी आपली उपस्थिती लावतात व आपली सेवा गुरुचरणी समर्पित करतात शिवनाम सप्ताहाच्या सांगताच्या एक दिवस अगोदर भव्य दिव्य पालखी व मिरवणूक संपन्न झाली. त्याचबरोबर या मिरवणुकीमध्ये संयुक्तपणे गुरुराज माऊली व विरूपाक्ष महाराज की जय, गुरु गिरी महाराज की जय असा जयघोष करत पाऊले खेळत अतिशय उत्साही व आनंदी वातावरणात संपन्न झाली. या मिरवणूकस हजारोंच्या संख्येने शिष्य सदभक्त व मानूर पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थ यांच्या उपस्थिती होती. यावेळी या शिवनाम सप्ताहस बार्शी परंडकर बृहन्मठाचे श्री ष ब्र १०८ सद्गुरू राचलिंग शिवाचार्य परंडकर महाराज यांनी मानूर येथील सप्ताहात मिळणारा आनंद म्हणजे स्वर्गामध्ये मिळणारा आनंद आहे म्हणून संबोधले, तर माढा येथून आलेले श्री ष ब्र १०८ सद्गुरू प्रभुदेव शिवाचार्य माढेकर महाराज यांनी आपल्या जीवनात गुरूस्थान किती महत्वाचे आहे हे स्पष्ट केले आणि मानवी जीवनात शिक्षणाप्रमाणे संस्काराला महत्त्व देणे गरजेचे आहे असे उपस्थितांना संबोधित केले. तसेच बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी श्री शिवकुमार स्वामी साहेब, दिव्य लोकप्रभाचे संपादक तथा मानूर गावचे भुमीपुत्र संतोषजी मानूरकर, दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी, मानूर येथील जेष्ठ नेते दशरथरावजी वनवे (दादा), रामदास बडे, आदीनाथ नागरगोजे, भारत पाखरे, बाळासाहेब शिरसाठ, कलंदर पठाण, जयशिंग शिरसाठ व अशा असंख्य लहानथोर मंडळींची उपस्थिती होती. त्याचबरोबर मठसंस्थानाचे हजारो शिष्य व सदभक्त या सोहळ्यास उपस्थित होते.या अखंड शिवनाम सप्ताहास ३६ स्वामींची महत्वपूर्ण उपस्थिती होती तसेच अन्नदात्यानी अन्नदान व सेवा करणाऱ्यांनी तन-मन-धनाने सेवा करत आपली सेवा गुरू माऊलीच्या चरणी समर्पित केली.

# राजमाता जिजाऊ वस्तीगृहात जिजाऊ जन्मोत्सव साजरा

मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड( १२ जानेवारी) शहरातील नामांकित राजमाता जिजाऊ वस्तीगृहामध्ये १२ जानेवारी रोजी स्वराज्य जननी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याच दिवशी युवकांचे प्रेरणास्थान असलेले तेजस्वी व्यक्तिमत्व स्वामी विवेकानंद यांची जयंती ही उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त वस्तीगृहातील उपस्थित विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्टरित्या महामानवच्या जीवन चरित्रावर भाषणे केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दंतरोगतज्ञ डॉ. पांडुरंग श्रीरामे तर प्रमुख अतिथी म्हणून जि. प.प्रा शाळा जांभळीचे मुख्याध्यापक, सूर्यवंशी सर, केमिस्ट तालुकाध्यक्ष बाळानंद गबाळे, डॉ. सिद्धांत इंगोले, सहशिक्षक संतोष तळेगावे सर, ए. सी जाधव सर,प्रथम मान्यवराच्या हस्ते जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदनेने करण्यात आली .तदनंतर वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी भाषणे केली. यामध्ये उत्कृष्ट भाषण करणाऱ्या विद्यार्थ्यास मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. प्रथम बक्षीस मिळवणारा विद्यार्थी पांडुरंग रामदास वडेर, व द्वितीय पारितोषिक मिळवणारा विद्यार्थी, निरंजन वडजे तसेच तृतीय म्हणून ऋतुराज पाटील व उपस्थित सर्व भाषणे करणाऱ्या विद्यार्थ्यांना छोटेसे बक्षीस संचालक गंगाधर बिरादार सर यांच्या वतीने देण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांचे भाषणे संपल्यानंतर उपस्थित डॉ. सिद्धांत इंगोले सरांनी त्यांना मार्गदर्शन केले, तसेच तळेगावे सरांनी जिजाऊ माँसाहेब यांच्या जीवन चरित्रावरील काही महत्त्वपूर्ण गोष्टी सांगितल्या तसेच त्यांच्या आवडीची स्वप्नातली परी ही कविता म्हणून दाखवली या कविता म्हणताच सर्व मान्यवरांसह विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. विठ्ठलराव सूर्यवंशी सरांनी जीवनातील आईचे महत्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. समारोपर भाषणामध्ये डॉ. पांडुरंग श्रीरामे सर म्हणाले की विद्यार्थ्यांनी सोयी सुविधेपेक्षा आपल्या ध्येयाकडे अधिक लक्ष द्यावे आणि आपण ग्रामीण भागातले आहोत म्हणून न्यूनगंड न बाळगता परिश्रम घेऊन आलेल्या अडचणीला यशाची संधी समजून पाहिलं पाहिजे, आणि वेळेला महत्व दिलं पाहिजे ग्रामीण भागातील



विद्यार्थी सुद्धा, डॉक्टर इंजिनियर कलेक्टर व सर्व स्तरातील मोठे अधिकारी होऊ शकतात पण त्यासाठी जिद्द ,चिकाटी अधिकचे परिश्रम घेणे अतिशय गरजेचे आहे पण त्यानंतर तुम्ही कितीही मोठे व्हा ! अधिकारी व व्यवसायिक क्षेत्रातील उद्योजक व्हा ! पण तुमच्याकडे वक्तृत्व , बोलण्याची शैली नसेल तर तुम्ही त्या क्षेत्रात नावलौकिक मिळू शकत नाही. त्यामुळे आपल्यामध्ये बोलण्याची कला अवगत असणे अतिशय गरजेचं आहे त्यामुळे बिरादार सरांनी जी संधी तुम्हाला या ठिकाणी उपलब्ध करून दिलेली आहे त्या संधीचं तुम्ही सोनं केलं पाहिजे. या कार्यक्रमाचे आभार राजमाता जिजाऊ वस्तीगृहाचे संचालक गंगाधर बिरादार सर यांनी मानले व उपस्थित मान्यवरांनी आपला अमूल्य वेळ देऊन कार्यक्रमाला उपस्थिती लावल्याबद्दल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, नितीन पवार, गणेश टापरे माधव बोमनगे, सर्वच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



अंबड – युवा सेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर यांची वाढदिवसानिमित्त भेट घेऊन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संतोषराव मोहिते युवा सेनेचे जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर, अजय कदम, उपजिल्हाप्रमुख गणेश मोहीते, आदित्य घुगे, सरपंच संदीप काळे यांची उपस्थिती होती.

# टेंभुर्णी चे सरपंच मिथुन डोंगरे यांना मातृशोक

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील टेंभुर्णी गावचे सरपंच मिथुन डोंगरे यांच्या मातोश्री द्रोपदाबाई दगडू डोंगरे वय वर्ष ७५ यांचे नुकतेच निधन झाले त्यांच्यावर मोठ्या शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले .अत्यंत शांत स्वभावाच्या असलेल्या द्रोपदाबाई दगडू डोंगरे यांची टेंभुर्णी परिसरात मोठी ख्याती होती गोरगरीब व सर्वसामान्यांच्या अडीअडचणीला त्या वेळोवेळी मदत करीत असत शुक्रवारी दिनांक १० रोजी त्यांचे निधन झाले त्यांच्या निधनाने परिसरात मोठी शोककळा पसरली होती त्यांच्यावर मोठ्या शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. आमदार सुरेश आण्णा धस य यांचे निकटवर्ती व अत्यंत विश्वासू असलेले सरपंच मिथुन डोंगरे यांच्या त्या मातोश्री होत्या .त्यांच्या मागे एक मुलगा एक मुलगी सुना नातवंडे असा मोठा परिवार असून दि.१९ रविवार रोजी त्यांचा दशक्रिया विधी टेंभुर्णी येथील डोंगरे वस्ती



या ठिकाणी सकाळी साडेनऊच्या सुमारास होणार आहे.

# माजी मंत्री राजेश टोपे यांचा "सहकारातील नेतृत्व पुरस्कार" देऊन गौरव

अंबड ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना लि.,अंकुशनगर,या साखर कारखान्याचे मार्गदर्शक मा.श्री.राजेशभैय्या टोपे साहेब, माजी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना स्वातंत्र्यसैनिक सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात व हरित क्रांतीचे प्रणेते डॉ.अण्णासाहब शिंदे जयंती महोत्सव निमित्त दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी संगमनेर येथे आयोजीत कार्यक्रमामध्ये सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सेवाभावी संस्था पुरस्कृत "सहकारातील नेतृत्व पुरस्कार" खासदार श्रीमंत श्री शाहू महाराज यांचे हस्ते देऊन गौरविण्यात आले आहे. याप्रसंगी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी विरोधी पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार, खासदार भाऊसाहेब वाघचौरे, आमदार सत्यजित तांबे, आमदार हेमंत ओगले, माजी आमदार मोहन दादा जोशी, जेष्ठ विचारवंत डॉ.रावसाहेब कसबे, जेष्ठ पत्रकार मधुकर भावे व इतर मान्यवर उपस्थित होते. माजी मंत्री राजेश टोपे यांनी यावेळी बोलतांना आपल्याला मिळालेला हा पुरस्कार कर्मयोगी अंकुशरावजी टोपे साहेब व कारखान्याचे सभासद, शेतकरी, अधिकारी व कर्मचायांना समर्पित केला.




माजी मंत्री राजेश टोपे यांनी साखर कारखानदारी क्षेत्रात केलेल्या भरीव कार्याची यानिमित्ताने वरीष्ठ पातळीवर दखल घेतली गेली आहे. याबद्दल कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षा, उपाध्यक्ष, संचालक मंडळ, व्यवस्थापकीय संचालक, कार्यकारी संचालक, खाते/ विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, कामगार व हितचिंतक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# खरडगव्हाण येथील युवा शेतकरी विष्णू वाडेकर शेतीतून कमवतात पंचाहत्तर लाख रुपये निव्वळ नफा

## कृषि अधिकारी गोरख तरटे यांचे मोलाचे मार्गदर्शन वीस एक्कर शेती मध्ये १२ एक्कर कांदा व ८ एक्कर पेरु

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुका हा दुष्काळी व उसतोड मजूराचा तालुका हि ओळख इतिहास जमा होईल असे युवा शेतकरी विष्णू सुभाष वाडेकर यांच्या प्रयत्नातून पहायवास मिळत आहे,आसे युवा शेतकरी जर गावा गावात तयार झाले तर अगदी कमी कालावधीत हे शक्य होणार आहे...आष्टी तालुक्यातील खरडगव्हाण येथील युवा शेतकरी विष्णू सुभाष वाडेकर यांनी आपल्या शेतात अगदी कमी पाण्यावर कांदा व पेरुची लागवड करुण वर्षाला एक कोटी पेक्षा उत्पन्न घेऊन एक आदर्श निर्माण केला आहे.विष्णू वाडेकर यांनी खूप मेहनत करुण फळ बाग लागवड करण्या आगोदर सुरवातीला १४ वर्ष मोटार वायरिंगचे काम करूण थोडे थोडे पैसे जमा करुण प्रथम एक पोल्ट्री फार्म उभा केले,आगोदर खूप काही माहिती नसल्याने सुरवातीला १३ लाख रूपये तोटा ही सहन करावा लागला,तोटा झाल्यानंतर हि डगमगून न जाता पुन्हा जोमाने कामाला केली,शेती करायची आसेल तर प्रथम पाणी पाहिजे हे त्यांनी लक्षात घेउन दहा वर्षापूर्वी प्रथम ३३ बाय ३३ चा शेततलाव करुण प्रथम पाण्याची सुविधा करुण कांदा पिकाचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली.

२०१९ मध्ये डाळींबाची लागवड केली होती,डाळींबाच्या बागेची भरपूर फवारणी करावी लागत असल्याने काही वर्षांत डाळींबाची बाग तोडून.२०२३ मध्ये तब्बल ८ एक्कर मध्ये पेरुची लागवड केली आहे तर २०२४ मध्ये आडिच एक्कर कांदा लागवडी मध्ये तब्बल १३ लाख रुपये नफा मिळाल्यावर कांदा पिका बरोबर ८ एक्कर शेतात पिंकतायवान जातीचे पेरूचे तब्बल तेरा हजार रोपांची लागवड करुण सेंद्रिय पध्दतीने शेती करत आहेत बाहरदार पेरुनी झाडे बहरूण गेले असून जवळपास या झाडांना सहा लाख फुन बॅग लावण्यात आल्या असून एका पेरुचे वजन सरासरी ३०० गॅम ते १००० ग्रॅम पर्यंत भरत असून जवळसास १५० टन पेरुचे उत्पादन होणार आहे...या पेरुसाठी अहिल्यानगर येथील व्यापारी थेट युवा शेतकरी विष्णू सुभाष वाडेकर यांच्या शेतात येऊन माल खरेदी करत असल्याने शेतकरी वाडेकर यांना बाजारपेठ जायची गरज पडत नाही..ही सर्व फळबाग यशस्वी होण्यासाठी तालुका कृषि अधिकारी गोरख तरटे व मंडळ अधिकारी अशोक चव्हाण व अमोल राउत व कृषि सहाय्यक आशा गोरे मॅडम यांचे वेळोवेळी तज्ञ मार्गदर्शन मिळत असल्याने हा माझा आधिनिक शेतीतील प्रयोग यशस्वी होत आहे आसे युवा शेतकरी विष्णू सुभाष वाडेकर यांनी माहिती देतांना सांगितले आहे.अल्पशा पाण्यावर भरपूर उत्पादन घेण्याची हातोटी विष्णू वाडेकर या शेतकऱ्याला जमल्याने वर्षाला पेरु मध्ये जवळपास ७५ लाख रूपये उत्पन्न अपेक्षित आहे..तर १२ एक्कर कांदा मध्ये ३५ लाख रुपये होणार आहेत व पोल्ट्री मध्ये १० लाख पेक्षा अधिक उत्पादन होत असल्याने युवा शेतकरी विष्णू सुभाष वाडेकर यांच्या शेता मध्ये वर्षभरासाठी पंधरा ते वीस व्यक्तींना रोजगार मिळत आहेत.यामुळे येथील ग्रामस्थांना रोजगारासाठी बाहेर जाण्याची गरज भासत नाही. विष्णू वाडेकर यांच्या या सुधित शेतीमुळे पंधरा कुटूबांचा उदरनिर्वाह भागत असल्याने येथिल कामगार समाधी आहेत..



यावेळी पत्रकारांशी बोलताना युवा शेतकरी विष्णू सुभाष वाडेकर यांनी सांगितले की शेती हि खूप परवडत आहे, फक्त योग्य वेळी योग्य नियोजन करा व बळबागेकडे शेतकऱ्यांनी वगळे गरजेचे आहे.मी सध्या चार वर्षांपासून बाजरी,गहू, ज्वारी विकत घेत आहे, पारंपरिक पद्धती ऐवजी फळबागनमूळे शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होत असल्याने शेतकऱ्यांनी फळबागेची कास धरावी आसे युवा शेतकरी विष्णू सुभाष वाडेकर यांनी सांगितले आहे....

सेंद्रिय पध्दतीने शेती करुण आगदी अल्प पाण्याच्या बचतीने भरघोस उत्पादन घेऊन २० एक्कर मध्ये १२ एक्कर कांदा व ८ एक्कर पेरु लागवड केली करुण. शेतीला जोडधंदा म्हणून दहा हजार पक्षींची पोल्ट्री आहे यामधून हि १२ लाख रुपये मिळत आहेत.कोटी पेक्षा जास्त उत्पादन होत असल्याने निवळ पंचाहत्तर लाख रूपये होत आहे...

### दरवर्षी सरकारला देत आहेत टॅक्स...

युवा शेतकरी विष्णू सुभाष वाडेकर हे दरवर्षी सरकारला जवळपास दिड लाख रुपये टॅक्स भरत असल्याने त्यांना याचा भरभरून फायदा होत आहे, युनियुन बँकने झिरो डाऊनलोड पेमेंटर बोलेरे गाडी दिली आहे..व पंधरा मजूरांना गावातच काम उपलब्ध झाल्याने मजूरांचे स्थलांतर थांबले आहे...



बीड – शहरातील भगवान बाबा मंदिरात पुण्यतिथीनिमित्त बाबांना विनम्र अभिवादन करताना नवनाथ अण्णा शिराळे व आत्माराम शिराळे

# अंबड फैसलाबाद मधून तीन वर्षीय चिमुकली बेपत्ता अंबड पोलीसांची शोध मोहीम सुरू

अंबड ।प्रतिनिधी

अंबड शहरातील फैसलाबाद कॉलनीत राहणारे शेख अमजद हाजी यांची तीन वर्षीय चिमुकली इकरा अमजद शेख ही दि.१२ रविवार रोजी दुपारी तीन ते साडेतीन वाजेच्या दरम्यान फैसलाबाद कॉलनीतून बेपत्ता झाली असून अंबड पोलिसांनी तिची शोध मोहीम सुरू केली आहे.बेपत्ता झालेल्या मुलीचे वर्णन दिलेल्या प्रमाणे असून नाव इकरा अमजद शेख वय:३ वर्षे १ महिना शरीर बांधा सडपातळ उंची २.५ फुट चेहरा गोल रंग गोरा भाषा हिंदी अंगावर कपडे गुलाबी रंगाचा फ्रॉक मुलगी हरवल्याची कळताच कुटुंबीयांनी अंबड पोलीस ठाण्यात तक्रार दिली पोलिसांनी गु.र.नं.२२/२०२५ कलम १३७ (२) बी.एन.एस.प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस आणि मुलीच्या कुटुंबीयांनी नागरिकांना आवाहन केले सदर



वर्णनाची बेपत्ता मुलगी कोठेही दिसल्यास व माहिती मिळाल्यास खालील दिलेल्या क्रमांकावर शेख अमजद हाजी ८०५५५८५२९४ पोलीस ठाणे अंबड ८४५९६१०४८६,९९६०३७९९२६,८८५०२९९०५५ तात्काळ संपर्क करुन माहिती द्यावी. तपास पोनि.सतिश जाधव,सपोनि.अमोल गुरले करीत आहे.



## अन्नपूर्णा देवी रोटी बँक संस्थेच्यावतीने पाटोदा येथे अन्नदान

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा येथील अन्नपूर्णा देवी रोटी बँक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने गोरगरीब, अनाथ, अंध, भुकेने त्रासलेल्या व्यक्तींना अन्नदान करण्यात येते. समाजातील इच्छुक व्यक्तींच्या माध्यमातून हा नाविन्यपूर्ण उपक्रम सतत राबवला जातो. याचाच एक भाग म्हणून बाळासाहेब जगन्नाथ काळुसे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सोमवार दि.१३ जानेवारी रोजी पाटोदा येथे संस्था संचालक संतोष गर्जे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आन्नदान करण्यात आले.

अन्नपूर्णा देवी रोटी बँक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने वर्षाचे ३६५ दिवस अन्नदानाचे कार्य पाटोदा येथील बसस्थानक परिसरात अविरत सुरु आहे. समाजातील गोरगरीब, अनाथ, दिव्यांग, मतिमंद व भुकेलेल्यांच्या पोटी दोन घास जावेत हाच या मागचा उद्देश. संस्थेचे संचालक संतोष गर्जे महाराज गत तीन वर्षापासून भुकेलेल्यांची सेवा करत आहेत. समाजातील नागरीक देखील त्यांच्या या कार्याला पाहून प्रेरित झाले असून स्व:ईच्छेने नागरीक वाढदिवसावर खर्च न करता अथवा संतांची जयंती, पुण्यतिथीच्या निमित्ताने रोटी बँकेच्या माध्यमातून 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले' या म्हणीप्रमाणे भुकेले असणार्यांसाठी अन्नदानाची व्यवस्था करतात. सोमवार दि.१३ जानेवारी रोजी बाळासाहेब जगन्नाथ काळुसे यांचा वाढदिवस असल्याने त्यांनी वाढदिवसावर होणारा खर्च टाळून समाजातील गोरगरीब, अनाथ, दिव्यांग, मतिमंद व भुकेलेल्यांसाठी अन्नदान करुन सेवा केली. यावेळी महाराष्ट्र राज्य परिवहनचे पाटोदा तालुका अधिकारी विकास खेडकर, आंबा कृषी तंत्रज्ञान सल्लागार प्रकाश नागरे, वडझरीकर, सानप, सामाजिक कार्यकर्ते डॉ.संजय तांदळे, डॉ.लक्ष्मण पवळ यांच्यासह व्यापारी, समाजसेवक, धार्मिकक्षेत्रातील मान्यवरांसह परिसरातील नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्रातील एकमेव उपक्रम

पाटोदा येथील संतोष गर्जे महाराज यांच्या संकल्पनेतून सुरु केलेल्या अन्नपूर्णा देवी रोटी बँक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून भुकलेल्यांसाठी अन्नदान आणि तोही वर्षातील ३६५ दिवस अवितरण पणे चालू असल्याने महाराष्ट्रातील एकमेव उपक्रम आहे. यासाठी समाजातील इच्छुक व्यक्तींनी या उपक्रमात सहभाग घ्यावा असे आवाहन संतोष गर्जे महाराज यांनी केले आहे.

# 'सावरकर' मध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा' विद्यापीठ समितीची भेट

**बीड ।प्रतिनिधी**

**वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणी करीता महाराष्ट्र शासनाद्वारे जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात आलेली असून बीड जिल्ह्यासाठी अध्यक्ष म्हणून प्रो. विना हुंबे अधिष्ठाता, वाणिज्य शाखा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड येथे ग्रंथालयास भेट दिली.**

भेटीदरम्यान महाविद्यालया द्वारा १ ते १५ जानेवारी या दरम्यान राबवल्या जात असलेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा व स्कूल कनेक्ट २.० या उपक्रमाचा आढावा त्यांनी घेतला. यावेळी संबंधित कार्यक्रमाचे महाविद्यालय समितीचे सर्व सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. सुहास मोराळे, ग्रंथपाल प्रो. अनुजा कास्तीकर यांनी महाविद्यालयातील घेतल्या गेलेल्या सर्व उपक्रमाबद्दल विद्यापीठ समितीस अवगत केले.

डॉ. विना हुंबे यांनी वाचन संकल्प महाराष्ट्राचा व स्कूल कनेक्ट २.० या उपक्रमा संबंधी विद्यार्थ्यांनी अधिकाधिक लाभ घेऊन स्वतःचे व्यक्तिमत्व जोपासावे असावे असे आवाहन करून उपक्रमासाठी महाविद्यालयास शुभेच्छा दिल्या व समाधान व्यक्त केले. प्राचार्य प्रो. सुहास मोराळे यांच्या अध्यक्षीय समारोपात म्हणाले महाविद्यालयाने या दोन्ही उपक्रमांचे भरघोस नियोजन करून ते उत्कृष्ठ पद्धतीने राबवले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रो. रूपाली कुलकर्णी यांनी केले तर प्रास्ताविक प्रो. अनुजा कास्तीकर, आभार डॉ. रमेश खंडागळे यांनी व्यक्त केले. उपक्रम यशस्वीतेसाठी श्री. सचिन चौरे आणि बाळासाहेब वाघमारे यांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर व प्रो. उत्तम साळवे, सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.





## स्वानंद सार्वजनिक वाचनालय स्टेट बँकऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक महेश आनंदगावकर यांचा सत्कार सोहळा संपन्न

केज/ प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज.जि.बीड.येथे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा धारूरचे शाखा व्यवस्था पक महेश माणीकराव आनंदगांवकर यांनी दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी सदिच्छा भेट दिली.यावेळी स्वानंद सार्वजनिक वाचनालया च्या वतीने त्यांचा शाल,श्रीफळ,पुष्पहार देवून ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,माजी प्राचार्य,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक वसुदेव बप्पा गायकवाड यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी ग्रामीण भागात दर्जेदार व लोकाभिमुख ग्रंथालय पाहून खुपच समाधान वाटल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.यावेळी रविंद गायकवाड (पेंटर) यांनी प्रास्ताविक,सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन केले.

# साने गुरुजी निवासी विद्यालयात मोठ्या उत्साहात क्रीडा महोत्सव साजरा

केज/प्रतिनिधी

साने गुरुजी निवासी विद्यालय,केज येथे दि.१२ व १३ जानेवारी रोजी क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळाचे अध्यक्ष श्री. उद्धवराव कराड यांच्या हस्ते करण्यात आले या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की,ग्रामीण भागातील खेळाडूंना आत चांगले भवितव्य आहे. कारण वाढत्यालोकसंख्ये मुळे शहरी भागात जमिनीचे कॉंक्रिटीकरण झाले असल्याने अनेक शाळा महाविद्यालयात मैदानी खेळासाठी मैदानच उपलब्ध होत नसल्याने शहरी भागातील खेळाडू हे इनडोअर खेळाकडे वळल्याचे दिसत आहे.या ग्रामीण भागातील खेळाडूंनी मैदानी खेळाकडे आपले लक्ष केंद्रित केले पाहिजे. खोखो सारख्या खेळाचे वर्ल्डकपचे यजमान पद आपल्या देशाला मिळाले या वर्ल्डकप मध्ये केज तालुक्यातील सामान्य घरातीलग्रामीणभागातील खेळाडू भारतीय खो-खो संघाचे नेतृत्व करत आहे हे आपल्या दृष्टीने गौरव आहे.शासन खेळा विषयी अनेक उपक्रम राबवित असुन विद्यार्थ्यांनी याचा पुरेपूर लाभ घेतलापाहिजे खेळामुळे शरीर हीनिरोगी राहते खेळ आजच्या काळात फारच आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.या क्रीडा महोत्सवात कबड्डी,खो-खो,लांब उडी, १००मीटर,२००मीटर,४००मीटर धावणे, कुस्ती, रस्सीखेच,दोरीवरील उड्या,रिंग्ज टेन्काइंड, बेसबॉल व सॉफ्टबॉल अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.स्पर्धा मध्ये सर्व मुलांनी सहभाग घेण्यासाठी वर्गशिक्षकांनी प्रोत्साहन दिले.तसेच आपला वर्ग जिंकण्या



साठी मुलांना विद्यार्थ्या सोबत चेअरअप करित होते.या क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संकुलाच्या प्राचार्या डॉ. कविता कराड-गित्ते मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांनी उत्साहामध्ये प्रतीसाद दिला.गित्ते मॅडम यांनी पंच म्हणून यशस्वी कामगिरी बजावली या स्पर्धा यशस्वी करण्या साठी क्रीडा शिक्षक रामदास सानप,चाटे बाबासाहेब,चोले सुदर्शन, दिपाली कांदे,दत्तात्रय घुले,चंपाकला डोंगरे, उत्तम मोती,श्रूती लहाने, मनिषा नागरगोजे,सचिन काळे,कल्पना जोशी, नागनाथ गुजर,ज्ञानेश्वर पवार,सुवर्णा सिरसट, जयदेवी दाजी आदिंनी परिश्रम घेतले विजयी स्पर्धकांना शालेय स्तरा वर बक्षीस वितरण करण्यात आले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

# गुरुनानक प्राथमिक विद्यालयात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी



बीड /प्रतिनिधी

श्री विठ्ठल गड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी (सांगवी )ता. केज जि. बीड संचलित गुरुनानक प्राथमिक विद्यालय शाहूनगर बीड येथे राजमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पवार एस. ए . होत्या तर प्रमुख वक्त्यांची भूमिका श्री.तांदळे ए.ए.आणि श्री गदळे आर. ए .यांनी पार पाडली.

राजमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन आणि मान्यवरांचा छोटेखानी सन्मान झाल्यानंतर राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्यावर आधारित विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली.यामध्ये स्वामी अनुजा, ओमसाई गायकवाड, सय्यद अश्मिरा, मकवाना रूतिका ,फाटक यशराज,यांचा समावेश होता तर जिजाऊंच्या वेशभूषेत आलेल्या राजनंदिनी दुबाले, मुंडे पंकजा, आराध्या भिसे, आरडे आरती, तिपाले श्रुती, जाधव अमृता, गिरे अनुष्का या विद्यार्थ्यांनी जिजाऊंची भूमिका उत्तमरीत्या साकारली.

प्रमुख मार्गदर्शक श्री. तांदळे सर यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जीवनकार्याचा इतिहास कथेच्या स्वरूपात उत्तम आरोह अवरोहासह विद्यार्थ्यांसमोर मांडून त्यांना मंत्रमुग्ध केले तसेच श्री. गदळे सर यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारित विविध प्रेरणादायी प्रसंग बारकाव्यासह विद्यार्थ्यांसमोर मांडून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे उत्तम असे सूत्रसंचलन श्रीमती मुंडे मॅडम यांनी केले तर आभार श्री. ठोकरे सर यांनी केले.यावेळी ठोकरे सरांनी विविध प्रसंगी टाळ्या कशा वाजवाव्यात याचे विविध प्रकार मुलांना शिकवले.जय जिजाऊ जय शिवराय च्या घोषणेने वातावरण सर्वत्र शिव जिजाऊमय झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे सहशिक्षक श्रीमती. पव्हणे मॅडम, श्रीमती डोंगरे मॅडम, तेलप सर, श्रीमती. शेळके ताई, यांनी परिश्रम घेतले.

# भूमी अभिलेख विभागाच्या क्रीडा स्पर्धा संपन्न



बीड /प्रतिनिधी

भूमी अभिलेख विभागाच्या सन २०२४ - २५ च्या विभागीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा दिनांक १० जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल बीड येथे संपन्न झाल्या. सदरील स्पर्धेचे उद्घाटन किशोर जाधव उप संचालक भूमी अभिलेख छत्रपती संभाजी नगर यांनी केले.प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्ह्याचे सुपुत्र प्रो कबड्डी लिगचे बंगाल वॉरियर्सचे खेळाडू वैभव गर्जे यांच्या हस्ते करण्यात आले.उद्घाटन प्रसंगी बोलताना किशोर जाधव उपसंचालक म्हणाले की, सर्व कर्मचाऱ्यांना कामाचे व्यापातून तणावमुक्ती व स्वतःचे फिटनेससाठी वेळात वेळ काढून रोज किमान एकएक तास व्यायाम एक तास तरी व्यायाम योगा करण्याचा सल्ला दिला. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत बीड जिल्ह्या क्रिकेट कबड्डी रस्ते खेच ४०० मीटर रील पुरुष व महिला या क्रीडा प्रकारात बीडने अंतिम विजेता पटकवले. याशिवाय विविध क्रीडा प्रकारात अनेक बक्षीस मिळवून जनरल चॅम्पियनशिप जिंकली तर नांदेड जिल्ह्यात स्पर्धेत उपविजेला ठरला या सर्व खेळाडूचे नियोजन कृष्णा शिंदे जिल्हा अधीक्षक बीड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व खेळाचे सर्व उपअधीक्षक भूमी अभिलेख व कर्मचारी अत्यंत व्यवस्थित पार पाडल्या व इतर जिल्ह्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी बीड जिल्ह्याने केलेल्या स्पर्धेचे नियोजन व विशेष श्री रवींद्र व मिलिंद शिवनीकर पुरवलेले भोजन व्यवस्था भरभरून कौतुक केले.

# शैक्षणिक क्षेत्रात डॉ. बाबासाहेबांचे योगदान अतुलनीय - डॉ.बागल



माजलगाव,(प्रतिनिधी) शैक्षणिक क्षेत्रातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतुलनीय असल्याचे प्रतिपादन राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.जिजाराम बागल यांनी केले.महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने विद्यापीठाचा३१वा नामविस्तार दिन कार्यक्रमात ते बोलत होते.अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना हे तर कार्यालयीन अधीक्षक विजय कुलकर्णी,विद्यार्थी विकास मंडळ प्रमुख डॉ.प्रेम राठोड उपस्थित होते.

नाम विस्तार दिनानिमित्त बोलताना डॉ.बागल यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगरच्या स्थापनेची पार्श्वभूमी सांगितली.१९५० ला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मिलिंद कॉलेजची स्थापना केली व पुढे २३ ऑगस्ट १९५८ला विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.परंतु विद्यापीठाला काय नाव असले पाहिजे यासाठी शासनाने एक समिती स्थापन केली. शासनाने विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याचे ठरवले.२७ जुलै १९७८ ला दोन्ही सभागृहांनी यास मान्यता दिली.अध्यक्षीय समारोपात डॉ.गजानन होन्ना म्हणाले की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आपण आदर्श घेतला पाहिजे व त्यानुसार वर्तन केले पाहिजे, असे ते म्हणाले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.कमलकिशोर लड्डा यांनी केले तर आभार डॉ.प्रेम राठोड यांनी मानले.

# दरोडा टाकण्याच्या पुर्वतयारीत असलेली ७ जणांची टोळी माजलगांव शहर पोलीसांकडुन जेरबंद



माजलगाव (प्रतिनिधी) शहरातील पो.स्टे.हद्दीत रात्री गस्त करीत असतांना गोपनिय माहीती मिळाली की,साठे चौक इंदिरानगर माजलगांव येथे काही लोक दरोडा टाकण्याच्या पुर्वतयारीनीशी एका स्कॉर्पीओ वाहनामध्ये अंधारामध्ये थांबलेले असल्याची माहीती मिळाल्याने त्यांनी पोलीस स्टाफसह तेथे जावुन दिनांक १४ पहाटे ४:०५ वाजता पडताळणी केली असता एका काळ्या रंगाच्या स्कॉर्पीओ वाहनामध्ये १)लक्ष्मण सोपान कदम,वय २७ वर्षे रा.टाकरवण ता.माजलगांव जि.बीड २) खालेद सय्यद अनिस,वय २६ वर्षे,रा.फुलेपिंपळगांव ता. माजलगांव जि.बीड ३) शहानवाज एजाजबाबर शेख, वय ३४ वर्षे रा.राजगल्ली माजलगांव ४)गणेश हनुमान नाईकनवरे वय २३ वर्षे,रा. टाकरवण ता.माजलगाव ५) दत्ता राजेभाऊ घाटे,वय २५ वर्षे रा.श्रृंगारवाडी ता. माजलगाव ६)शरद अर्जुन नाडे,वय २५ वर्षे,रा.शिवणगांव ता.घनसावंगी जि.जालना ह.मु.टाकरवण ता.माजलगाव जि.बीड ७)शेख उमेर पाशा वय २२ वर्षे रा.राजगल्ली माजलगांव ता.माजलगाव जि.बीड असे तोंड बांधुन स्थीतीत दरोडा टाकण्याच्या पुर्वतयारीसह संघटीतरित्या मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन एक स्कॉर्पीओ वाहन पासिंग क्रमांक चक-०४-उच-७१११ असा असलेले किंमत १० लाख रुपयाचे,वेगवेगळ्या कंपनीचे ७ मोबाईल किंमत १ लाख सतरा हजार रुपयाचे, नगदी ७९०/- रुपये, तसेच एक लोखंडी पाईप,एक लोखंडी रॉड,एक प्लास्टीकची काठी,एक लाकडी स्टंप,५ फुट नायलॉनची दोरी,मिर्ची पाऊडर असे ४५० रुपयाचे साहीत्य असा एकुण ११ लाख १८ हजार २४०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यांच्या विरुध्द गु.र.नं.१५/ २०२५ कलम ३१०(४),३१० (५) भारतीय न्याय संहीता -२०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पकडलेल्या काहीं आरोपीतां विरुध्द यापुर्वी गंभीर स्परुपाचे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई नवनित कॉवत,पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके,अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, डॉ. बी.धीरज कुमार,सहा. पोलीस अधीक्षक उपविभाग माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोउपनि माकणे,पोलीस हवालदार माधव तोटेवाड, चालक पोलीस नाईक दिनकर गायकवाड,पोलीस अंमलदार महेश चव्हाण,अनिल कानडे यांनी केली आहे.

# राजमाता जिजाऊ वस्तीगृहात जिजाऊ जन्मोत्सव साजरा



मुखेड, प्रतिनिधी

मुखेड( १२ जानेवारी) शहरातील नामांकित राजमाता जिजाऊ वस्तीगृहामध्ये १२ जानेवारी रोजी स्वराज्य जननी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याच दिवशी युवकांचे प्रेरणास्थान असलेले तेजस्वी व्यक्तिमत्व स्वामी विवेकानंद यांची जयंती ही उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त वस्तीगृहातील उपस्थित विद्यार्थ्यांनी

अतिशय उत्कृष्टरित्या महामानवच्या जीवन चरित्रावर भाषणे केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दंतरोगतज्ञ डॉ. पांडुरंग श्रीरामे तर प्रमुख अतिथी म्हणून जि. प.प्रा शाळा जांभळीचे मुख्याध्यापक, सूर्यवंशी सर, केमिस्ट तालुकाध्यक्ष बाळानंद गबाळे, डॉ. सिद्धांत इंगोले, सहशिक्षक संतोष तळेगावे सर, ए. सी जाधव सर,प्रथम मान्यवराच्या हस्ते जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदनेने करण्यात आली .तदनंतर वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी भाषणे केली. यामध्ये उत्कृष्ट भाषण करणाऱ्या विद्यार्थ्यास मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. प्रथम बक्षीस मिळवणारा विद्यार्थी पांडुरंग रामदास वडेर, व द्वितीय पारितोषिक मिळवणारा विद्यार्थी, निरंजन वडजे तसेच तृतीय म्हणून ऋतुराज पाटील व उपस्थित सर्व भाषणे करणाऱ्या विद्यार्थ्यांना छोटेसे बक्षीस संचालक गंगाधर बिरादार सर यांच्या वतीने देण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांचे भाषणे संपल्यानंतर उपस्थित डॉ. सिद्धांत इंगोले सरांनी त्यांना मार्गदर्शन केले, तसेच तळेगावे सरांनी जिजाऊ माँसाहेब यांच्या जीवन चरित्रावरील काही महत्त्वपूर्ण गोष्टी सांगितल्या तसेच त्यांच्या आवडीची स्वप्नातली परी ही कविता म्हणून दाखवली या कविता म्हणताच सर्व मान्यवरांसह विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. विठ्ठलराव सूर्यवंशी सरांनी जीवनातील आईचे महत्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. समारोपर भाषणामध्ये डॉ. पांडुरंग श्रीरामे सर म्हणाले की विद्यार्थ्यांनी सोयी सुविधेपेक्षा आपल्या ध्येयाकडे अधिक लक्ष द्यावे आणि आपण ग्रामीण भागातले आहोत म्हणून न्यूनगंड न बाळगता परिश्रम घेऊन आलेल्या अडचणीला यशाची संधी समजून पाहिलं पाहिजे, आणि वेळेला महत्व दिलं पाहिजे ग्रामीण भागातील विद्यार्थी सुद्धा, डॉक्टर इंजिनियर कलेक्टर व सर्व स्तरातील मोठे अधिकारी होऊ शकतात पण त्यासाठी जिद्द ,चिकाटी अधिकचे परिश्रम घेणे अतिशय गरजेचे आहे पण त्यानंतर तुम्ही कितीही मोठे व्हा ! अधिकारी व व्यवसायिक क्षेत्रातील उद्योजक व्हा ! पण तुमच्याकडे वक्तृत्व , बोलण्याची शैली नसेल तर तुम्ही त्या क्षेत्रात नावलौकिक मिळू शकत नाही. त्यामुळे आपल्यामध्ये बोलण्याची कला अवगत असणे अतिशय गरजेचं आहे त्यामुळे बिरादार सरांनी जी संधी तुम्हाला या ठिकाणी उपलब्ध करून दिलेली आहे त्या संधीचं तुम्ही सोनं केलं पाहिजे. या कार्यक्रमाचे आभार राजमाता जिजाऊ वस्तीगृहाचे संचालक गंगाधर बिरादार सर यांनी मानले व उपस्थित मान्यवरांनी आपला अमूल्य वेळ देऊन कार्यक्रमाला उपस्थिती लावल्याबद्दल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, नितीन पवार, गणेश टापरे माधव बोमनगे, सर्वच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# चौंडेश्वरी मातेच्या जयघोषाने वडवणी नगरी दुमदुमली



वडवणी प्रतिनिधी ( शंकर झाडे). -- प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षी वडवणी शहरांमध्ये समस्त कोष्टी समाज बांधवांची कुलस्वामिनी आई भगवती चौंडेश्वरी माता शाकंभरी नवरात्र उत्सव वर्षीमध्ये तीन नवरात्र येतात त्यांमधील शाकंभरी नवरात्र उत्सव आहे . संपूर्ण देशामध्ये कोष्टी समाजाची कुलस्वामिनी चौंडेश्वरी मातेचा उत्सव साजरा करण्यात येतो.पौष पौर्णिमा दिवशी मोठा उत्सव संबंध देशांमध्ये मोठ्या प्रमाणात कोष्टी समाज साजरा करतात.यावेळी वडवणी शहरात सोमवारी श्री चौंडेश्वरी देवीची भव्य दिव्य पालखी सोहळा मिरवणूक शोभायात्रा काढण्यात आली.या पालखी सोहळ्यात महिला मंडळी ने आपल्या घरासमोर रांगोळी काढून पालखी चे स्वागत केले.तसेच चिमुकल्या मुलीही डोक्यावर कळस घेऊन यात सहभागी झाल्या होत्या.यावेळी चौंडेश्वरी मातेच्या जय घोषणांनी वडवणी नगरी दुमदुमून गेली होती.त्यानंतर दुपारी वडवणी व पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांनी महाप्रसाद चा लाभ घेतला.

याबाबत अधिक माहिती अशी की समस्त कोष्टी समाज बांधवाची कुलस्वामिनी माता चौंडेश्वरी माता उत्सव पौष पौर्णिमा दिवशी देशभरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.उत्सव निमीत्ताने सात दिवस अंखड हरिनाम सप्ताह, विविध सामाजिक उपक्रम, सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यामध्ये सप्ताह मध्ये महाराष्ट्रातील ख्यातनाम किर्तन मंडळी चे किर्तन प्रवचन याठिकाणी संपन्न झाले.दिनांक १३/ ०१/२०२५ सोमवार रोजी सप्ताह ची सांगता रामयाणचार्य श्री नामदेव महाराज लबडे यांच्या काल्याच्या किर्तनाने संपन्न झाले.

# समाजाच्या कल्याणासाठी प्रत्येकाने प्रामाणिकपणा, निष्पक्षता आणि जबाबदारीची जाणीव ठेवावी: सुप्रिया वक्ते

पौष पौर्णिमेनिमित्त बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण

बीड : पौष पौर्णिमा हा बुद्धांच्या जीवनातील महत्त्वाचा दिवस असून, त्यांच्या शिकवणी आणि धम्मदेशनाचा मार्ग साजरा करण्याचा हा काळ आहे. तसेच, हा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर चिंतन करण्याची संधीही आहे, असे प्रतिपादन वडवणी येथील नायब तहसीलदार सुप्रिया श्रीमंत वक्ते यांनी केले.

महाविहार धम्मभूमी, डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन नगर, शिवणी येथे प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेच्या वतीने सोमवारी (दि. १३) पौष पौर्णिमा उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या प्रसंगी भिक्खु धम्मशील थेरो यांनी धम्मदेसना दिली.

कार्यक्रमात प्रा. डॉ. अनिता शिंदे, प्रा. डॉ. राणी जाधव आणि प्रा. आकांक्षा सोनवणे यांचे स्वागत करण्यात आले. प्रमुख अतिथी सुप्रिया वक्ते म्हणाल्या की, बुद्धांच्या जीवनात प्रत्येक पौर्णिमा महत्त्वाची ठरली आहे. पौष पौर्णिमेला दोन ऐतिहासिक घटना घडल्या-बुद्धांनी आपल्या पाच शिष्यांना पहिली धम्मदीक्षा दिली आणि मगध नरेश बिंबिसाराने वेळूवन भिक्खू संघास दान केले.

त्या पुढे म्हणाल्या की, बौद्ध धम्मातील शिकवणी आजही तितक्याच प्रासंगिक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्याय आणि समानतेसाठी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्यांच्या शिकवणुकीतून समाजात समता आणि बंधुता प्रस्थापित करण्याचा संदेश मिळतो.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या, बुद्धांच्या शिकवणींनी माझ्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांच्या तत्त्वांवर चालतच मी प्रशासकीय सेवेत काम करत आहे. समाजाच्या कल्याणासाठी प्रत्येकाने प्रामाणिकपणा, निष्पक्षता आणि जबाबदारीची जाणीव ठेवावी.

समारोप करताना त्यांनी उपस्थित विद्यार्थी आणि नागरिकांना बुद्धांच्या धम्ममार्गावर चालण्याचे आवाहन केले. पौर्णिमेचा प्रकाश अंधार दूर करतो, त्याचप्रमाणे धम्माचा प्रकाश अज्ञान आणि दुःख दूर करून समाजात शांती आणि समता प्रस्थापित करू शकतो, असेही त्या म्हणाल्या.

कार्यक्रमादरम्यान भिमबाणा २०२५ या दिनदर्शीकेचे विमोचन उत्तमजी हजारे यांच्या संयोजनाखाली भिक्खु संघ व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतून शेकडो उपासक सहभागी झाले होते. सूत्रसंचालन प्रा. अशोक गायकवाड यांनी केले तर आभार भास्कर सरपते यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेच्या सभासदांनी परिश्रम घेतले.



# आरटीई २५% मोफत प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरावे -प्राचार्या मोरे मनीषा

गेवराई (प्रतिनिधी) कै. चि. ओमकार प्रतिष्ठान राहेरी संचलित इरा मॉडेल इंटरनॅशनल स्कूल व जुनिअर कॉलेज तलवाडा च्या प्राचार्या मोरे मनीषा यांनी महाराष्ट्र शासन प्राथमिक शिक्षण संचालनालय यांचे जावक क्रमांक आर टी ई २५%/२०२५/८०१/१०८ दिनांक १३/०१/२०२५ परिपत्रकानुसार २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षाच्या शिक्षण हक्क अधिनियमानुसार दुर्बल घटक व वंचित घटकाकरिता २५% ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला दिनांक १४ /१/२०२५ ते २७/०१/२०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे तरी पालकांनी आपल्या पाल्यांची ऑनलाइन अर्ज २५% मोफत प्रवेशासाठी सदरील कालावधीमध्ये ऑनलाईन भरावीत. २५ टक्के मोफत प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज पालकांनी प्रवेश अर्ज भरावेत ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्र उदाहरणार्थ दुर्बल घटकातील पालकांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र. जन्म प्रमाणपत्र. रहिवासी प्रमाणपत्र. मुलाचे किंवा मुलीचे आधार कार्ड असल्यास आधार कार्ड. वंचित घटकातील मुलासाठी वडिलांचे जात प्रमाणपत्र. मुलाचे किंवा मुलीचे जन्म प्रमाणपत्र रहिवासी प्रमाणपत्र. दिव्यांग मुलासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सक यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र ४०% इत्यादी कागदपत्र आवश्यक आहेत. तरी २५% मोफत प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता काही अडचण आल्यास कै. ची ओमकार प्रतिष्ठान राहेरी संचलित हिरा मॉडेल इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेज तलवाडा च्या प्राचार्य मोरे मनीषा यांच्याशी संपर्क ९०४९१०५००३/९५६१३२४०१३/९०११४२०७६७ या नंबर वर संपर्क करावा किंवा प्रत्यक्षात शाळेच्या वेळेत सकाळी नऊ ते तीन पर्यंत प्रत्यक्षात अडचण विचारू शकतात तरी २५% मोफत प्रवेशाचा फायदा घेण्यासाठी सर्व पालकांनी ऑनलाइन अर्ज दिलेल्या मुदतीच्या आत भरावा. असे प्राचार्य मोरे मनीषा यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकानुसार कळविण्यात आले आहे



# भगवानगडावर मंगळवारी श्री संत भगवानबाबांचा पुण्यतिथी महोत्सव

मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गोविंदजी सानप यांचा भगवानगड ट्रस्टतर्फे होणार विशेष गौरव

शेवगाव प्रशांत बाफना

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचं दैवत श्री संत भगवानबाबा यांची मंगळवार दि.१४ जानेवारी रोजी ६० वी पुण्यतिथी आहे. या पुण्यतिथी सोहळ्यासाठी श्री क्षेत्र भगवानगडावर भव्य दिव्य मंडप उभारला आहे. सुमारे शंभर क्विंटल साखरेपासून महाप्रसाद बनवला आहे. वाहनांच्या पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था केलेली आहे. पुण्यतिथी निमित्ताने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी अनेक संस्थानांहून व गावांतून लहान-मोठ्या अनेक दिंड्या श्री क्षेत्र भगवानगडावर येत आहेत. मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय काटेकोरपणे सर्व देखरेख केली जात आहे.

मंगळवारी सकाळी ९ वाजता ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबांच्या समाधीची महापूजा होईल. सकाळी ११ ते १ या वेळेत काल्याचे कीर्तन व दुपारी १ वाजता महाप्रसाद वाटप करून कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

विशेष आकर्षण - महंत शास्त्रीजींचे कीर्तन

श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती तथा वारकरी संप्रदायाचे भूषण ह.भ.प.न्यायाचार्य श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी यांचे कीर्तन म्हणजे रसिकांसाठी एक पर्वणीच असते.मंगळवारी श्री संत भगवानबाबा यांच्या ६० व्या पुण्यतिथी निमित्ताने महंत शास्त्रीजींचे




काल्याचे कीर्तन होणार आहे. तरी सर्व भाविक-भक्तांनी वेळेवर श्री क्षेत्र भगवानगडावर हजर राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## शासकीय जमीनीवर वर्षांनु वर्ष बोगस पिक विमा ऊचलेला आहे या तक्रारीला एक महिना ऊलटला तरीही पंचनामा नाही

# वडवणी कृषीच्या गोपाल ढाकणेचा कामात हलगर्जीपणा कारवाईची मागणी

वडवणी/ प्रतिनिधि

वडवणी शहरातील शासन जमिनिवर गट क्र २६०, २५९ वर बोगस पिक विमा वर्षानुवर्ष ऊचलेला आहे अशी तक्रार दि ६-१२-२०२४ आसतांना देखील तेथील पिक पाहणी करून अहवाल सादर करावा आशा सक्त सुचना कृषी आधिकारी यांनी देऊन त्याचं पत्रक दि २६-१२-२०२४ रोजी काढण्यात आलेलं आहे.

सविस्तर वृत आसे कि, वडवणी शहरातील शासकीय जमीनीवर गट क्र २६०, २५९ वर बोगस पिक विमा वर्षानुवर्ष भरुन ऊचलेला आहे अशी तक्रार आबासाहेब राठोड व करण



ऊजगरे यांनी दि ६-१२-२०२४ रोजी कृषी आधिकारी यांच्याकडे केलेली आहे.जिल्हा कृषी आधिकारी,ऊपविभागीय कृषि अधिकारी,तालुका विमा प्रतिनिधि यांनाही माहितीस्तव सादर आहे.तेथील कृषी आधिकारी यांनी त्यासंदर्भांत पंचनामा करण्या संदर्भांत आदेशही काढला आहे व आपल्या स्तरावरुन स्थळ पाहणी करुन अहवाल पाठवा मात्र कृषी विभागाचे कर्मचारी गोपल ढाकणे यांनी कामात हलगर्जीपणा करत याचा पंचनामाही केला नाही,आणी ऑफीसमध्येही भेटत नाही, तक्रारदार यांनी एक महिना भरापासुन चकरा मारल्या फोन अनेकदा ऊचलत नाहीत, त्यामुळे कामात हलगर्जीपणा केल्याच्या कारणावरुन वरिष्टांनी गोपाल ढाकणेवर कारवाई का करू नये असा पवित्रा तक्रारदारांनी घेतला आहे.

# नूतन वसाहत उड्डाणपुलवरील खड्ड्यात बेशरमाची झाडे लावून अनोखे आंदोल

## रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरम आक्रमक.

डॉ आशिष तिवारी/जालना

जालना शहरातील रस्ते खड्डेमुक्त करण्याच्या मागणीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमने आक्रमक भूमिका घेत, प्रातिनिधिक स्वरूपात नूतन वसाहत उड्डाणपुलावरील खड्ड्यात बेशरमाची झाडे लावून युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव तथा फोरमचे जिल्हाध्यक्ष शेषराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली आज मंगळवार दि. १४ जानेवारी रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास अनोख्या आंदोलन केले आणि शासन-प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी केली.

शेषराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली अचानक करण्यात आलेल्या आंदोलनात

काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत रत्नपारखे, दीपक गायकवाड, गजानन भालसकर, संदीप भिसे, सुरज चत्रे, दीपक



दहिटे, रवी कुलकर्णी यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी उड्डाणपुरावरील खड्ड्यात बेशरमाची झाडे लावून हळदी कुंकवाद्वारे खड्ड्यांची पूजा करण्यात आली. याप्रसंगी शासन- प्रशासनाच्या तीव्र घोषणाबाजी करून निषेध नोंदविण्यात आला.

यावेळी शेषराव जाधव म्हणाले की, शहरातील बहुतांश रस्ते खड्डेमय बनले आहेत. याकडे शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष आहे. खोटी आश्वासने देऊन निवडणुका लढविल्या जातात. नंतर मात्र दुर्लक्ष केले जाते. आता सर्वांना महानगरपालिका निवडणुकीची घाई झाली आहे. मग या समस्या सोडणार कोण? खड्ड्यात वाहने आदळून अनेक अपघात झाले. काहींना प्राण गमवावे लागले तर अनेकजण फ्रॅक्चर झाले, जायबंदी झाले. नूतन वसाहत उड्डाणपूलावर अनेक ठिकाणी खड्डे आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय, न्यायालय, जिल्हा परिषद, तहसील कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, धर्मादाय आयुक्त कार्यालय, जिल्हा शासकीय रुग्णालय आदी शासकीय- निमशासकीय कार्यालयाकडे जाण्यासाठी हाच एकमेव रस्ता असून, तरीदेखील उड्डाणपुलावरील या खड्ड्याकडे जिल्हाधिकारी, महानगरपालिकेचे आयुक्त आदींसह प्रतिनिधींचेही लक्ष नाही.

# जिजाऊ ज्ञानमंदिरात जिजाऊ मॉसाहेब जन्मोत्सव उत्साहात साजरा

मुखेड ( प्रतिनिधी )

सर्वच सण उत्सव उत्साहात साजरे करण्यात अग्रेसर असलेल्या मुखेड येथील निसर्गसौंदर्याने नटलेल्या जिजाऊ ज्ञानमंदिर सेमी इंग्लिश स्कूल मध्ये हिंदवी स्वराज्य जननी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मॉसाहेब यांची जयंती १२ जानेवारी रोजी उत्साहात साजरी करण्यात आली.

याच दिवशी युवकांचे प्रेरणास्थान असलेले तेजस्वी व्यक्तिमत्व स्वामी विवेकानंद यांची जयंती असल्याने व ३ जानेवारी या दिवशी भारतीय पहिल्या महिला शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची ही जयंती होती याचाच त्रिवेणी संगम साधून तीन्ही महान विभूतींचा जन्मोत्सव कार्यक्रम साजरा करण्याचे आयोजन जिजाऊ ज्ञानमंदिरात करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक ज्ञानोबा जोगदंड सर तर प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक एकनाथ डुमणे सर , आय सी टी कॉम्प्यूटरचे संचालक तथा संगणक तज्ञ गजानन गेडेवाड सर , सुप्रसिद्ध कथाकार तथा शिवव्याख्याते सुरेशराव वडजे सर , मुख्याध्यापक जगदीप जोगदंड सर हे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवराच्या हस्ते तीन्ही महा विभूतींच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संगीतशिक्षक सचिन सुर्यवंशी व विनिता चव्हाण या दोघांनी गायलेल्या जिजाऊ वंदनेने व कवी ज्ञानोबा जोगदंड रचित स्वागतगीताने करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी तीन्ही विभूतींच्या प्रतिमेचे पूजन केले. शाळेच्यावतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान अधून मधून भाषणे, समुह नृत्य , वैयक्तिक गीत घेत नाटिका सादर करीत कार्यक्रमाची रंगत वाढत गेली. भाषणासाठी विद्यार्थ्यांकडून उंदड प्रतिसाद मिळाल्याने एका दिवसात कार्यक्रम आटोपता आला नाही. कार्यक्रमात राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब , स्वामी विवेकानंद , क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन व कार्यावर विद्यार्थी वक्त्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. विजया जाधव मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली नर्सरीच्या अधिरा मुंडे व संच या चिमुकल्या मुलींनी जिजाउंच्या पाळण्यावर समुहनृत्य सादर केले. सायराबानू शेख मॅडम पहिल्या वर्गातील आरोही जायम्हेत्रे व संच या मुलींनी साक्षरता गीत सादर केले. याच आरोही जायम्हेत्रे या मुलीने स्त्रीभ्रुण हत्या या विषयावर एकपात्री प्रयोग सादर करून प्रेक्षकांच्या डोळ्यांतून खळकन पाणी काढले. दरम्यान प्रमुख अतिथी गजानन गेडेवाड सर यांनी युवकांचे प्रेरणादायी व्यक्तिमत्व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की , आपली बुद्धिमता वाढविण्यासाठी पुस्तके गतीशीलतेने वाचने महत्वाचे आहे. ज्ञानसाधने शिवाय आपल्याला यश प्राप्त करता येणार नाही. त्यासाठी ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका. असा विचार आपल्या मनोगतातून व्यक्त केला. सरिता जोशी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली ' जन्म बाईचा बाईचा ' या गाण्यावर समुहनृत्य सादर केले. शिवमाला पेड मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली मानवी घोरपडे या मुलीचे एकपात्री नाटक तसेच समृद्धी सहस्त्रमोड , रुद्र पेड व संच या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील एका प्रसंगाचे नाट्य रुपांतर अतिशय सुंदर असे सादरीकरण केले. दरम्यान केलेल्या भाषणात सुप्रसिद्ध साहित्यिक एकनाथ डुमणे सर यांनी महिलांनी अंधश्रध्दा न बाळगता वैज्ञानिक दृष्टी ठेऊन डोळसपणाने वागावे. प्रत्येक गोष्टीबाबत चिकित्सक




बारकावे शोधून खऱ्या खोट्यांची पारख करावी. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नये. सावित्रीबाई फुले यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वतः शिकून मुलींना शिकविण्याचा विडा उचलला. असा विचार त्यांनी आपल्या मनोगतातून मांडला. शिवव्याख्याते सुरेशराव वडजे सर यांनी जिजाऊ माँसाहेब जन्मोत्सवावर आपल्या कथात्मक शैलीतून प्रकाश टाकला. जिजाऊंच्या जन्मापासून ते स्वराज्य स्थापनेपर्यंत. शिवबांचा गनिमीकावा व शत्रू सैन्याकडून येणारे अडसर त्यावर जिजाऊंनी शिवरायांना केलेले उपदेश या सर्व इतिहासकालीन घटनांवर त्यांनी भाष्य केले.



कडा - येथील वरिष्ठ पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यद यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करून शुभेच्छा देतांना संदिप गावडे, शाहिद पठाण, संदिप खेडकर अल्ताब शेख दिसत आहेत.

# मानेवाडी येथे माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती मोठया उत्साहात साजरी

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मानेवाडी येथे राजमाता जिजाऊ महिला सेवाभावी संस्थेच्या वतीने माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरूवात जिजाऊ वंदना घेऊन करण्यात आली त्यानंतर स्व.संतोष (आण्णा)देशमुख व सोमनाथ सुर्यवंशी यांना श्रंध्दाजंली अर्पन करून पुढील कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमाच्या




अध्यक्षस्थानी बीड कृषी उत्तपन्न बाजार समितीच्या सभापती सौ.सरलाताई मुळे पाटील तर कार्यक्रमाच्या प्रमुख व्याख्यात्या म्हणुन सौ.माधुरीताई घुमरे (बीड) या होत्या तर प्रमुख उपस्थिती म्हणुन रोहिणीताई राजेशजी तांगडे (बीड)या होत्या त्यानंतर प्रमुख व्याख्यात्या माधुरीताई घुमरे यांनी जिजांऊची राजनिती व जिजाऊ काय होत्या त्याच बरोबर सावित्रीबाई फुले,माता रमाई,राजमाता अहिल्यादेवी यांची यशोगाथा संर्वासमोर मांडली विद्यार्थीनी दुर्वा दिपक गाढवे हिने जिजाऊच्या वेशभुषेत जिजाऊ विषयी विचार मांडले या कार्यक्रमाचे आभार अविनाश रमेश माने यांनी मांडले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिगांबर तात्या आवारे यांनी केले व स्वामी विवेकानंद यांचे विचार सर्वाना सांगितले शेवटी विद्यार्थिनींनी शिवगीत व राष्ट्रगित घेउन दिगांबर तात्या आवारे यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

## जाहिरनामा

प्रकरण : मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नाव नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्या बाबत/नाव लावणयाबाबत/क्षेत्रफळ दुरूस्ती करणेबाबत)

कोर्ट तडजोडपत्र, सात बारा, पी आर कार्ड अधारे, अर्जदाराचे नाव व पत्ता-कोंडोपंत विनायक गुळवेलकर मार्फत. आ.मु. नलीनी कोंडोपंत गुळवेलकर, सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, स.नं.६२ त. गिराम क्षेत्र ४६४.६८ चौ.मी.वर कोंडोपंत विनायक पुळवेलकर मार्फत आ.मु. नलीनी कोंडोपंत गुळवेलकर चे नाव मालमत्ता रजिस्टरला नोंद आहे. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलणयास/नाव लावणयास / क्षेत्रफळ दुरुस्त करण्यास अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल अथवा हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत आक्षेप अर्ज दाखल करणे, मुदतीनंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड**

चर्तुः सिमा- कोर्ट तडजोडपत्र, सात बारा, पी आर कार्ड अधारे

# ज्ञानराधा मल्टीस्टेट ठेवीदार कृती समिती मुख्यमंत्र्याच्या भेटीला

## इतर संचालकाला अटक संचालकाची संपत्ती जमा करून ठेवीदारांना न्याय द्या-राहुल सोनटक्के



ज्ञानराधा मल्टीस्टेट मधील ठेवीदारांच्या ठेवी परत मिळणे तसेच संचालक मंडळ यांना तत्काळ अटक करून त्यांची संपत्ती करण्यात यावी यासाठी ज्ञानाचा ठेवीदार कृती समितीने शिर्डी येथे चालू असलेल्या अधिवेश ठिकाणी जाऊन मुख्यमंत्री तसेच विविध विभागाचे मंत्री आमदार यांना भेटून निवेदन देऊन मागणी केली आहे यावेळी कृती समितीचे पदाधिकारी ठेवीदार उपस्थित होते.

महाराष्ट्र मध्ये ज्ञानराधा मल्टीस्टेट च्या महाराष्ट्रात एकूण ५२ शाखा असून त्यामध्ये सहा लाख पन्नास हजार ठेवीदाराचे ३७५० कोटी रुपये ठेवी स्वरुपात अडकले असून मल्टीस्टेट चे अध्यक्ष व संचालक मंडळावर एकूण ६२ गुन्हे नोंद आहेत गुन्ह्यात तपास संथ गतीने चालू आहे. मल्टीस्टेट मधून स्वतः हा व्यवसायासाठी व मौजेसाठी ठेवीदारांची रक्कम अध्यक्ष सुरेश ज्ञानोबा कुटे सह इतर संचालक यांनी संगनमत करून अफरातफर करून हडप केली आहे. असा अहवाल ई.डी. (सक्त वसुली संचालनालय) यांच्या मार्फत सादर केले आहे. सदरील प्रकरणी सुरेश कुटे व इतर तीन संचालक यांना अटक केली आहे. उर्वरित संचालक अद्याप पर्यंत फरार आहेत ठेवीदारांच्या ठेवी परत न मिळाल्यामुळे ४५ लोकांनी आत्महत्या केल्या आहेत. शेकडो मुलां-मुलींचे लग्न थांबले आहेत व उच्च शिक्षणापासून वंचित राहून भविष्य अंधकार-मय झाले आहे. ठेवीदारांना न्याय मिळण्यासाठी अर्चना कुटे सह इतर संचालक यांना तात्काळ अटक करून त्यांची संपती जप्त करण्यात यावी. सदरील मल्टीस्टेट चे फोरेन्सिक ऑडीट करण्यासाठी चझखऊ कायद्यानुसार पोलीस अधीक्षक बीड यांना आदेशित करावे. उपजिल्हा निबंधक बीड समृध्द जाधव यांना सदरील मल्टीस्टेटचे ऑडीट करून छउडढ कोर्टात सर्व ठेवीदाराच्या वतीने दाखल करण्याचे आदेशित करून ठेवीदाराच्या ठेवी तत्काळ परत मिळण्यासाठी शासन स्तरावरून योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेशित करावे. या मागणीचे निवेदन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सह इतर विभागाचे मंत्री आमदार यांना दिले आहे मागणीची दखल तात्काळ घ्यावी नसता येणाऱ्या दिवसात लोकशाही मार्गाने मोठे आंदोलन उभा करू असा इशारा ज्ञानराधा मल्टीस्टेट ठेवीदार कृती समितीने दिला आहे यावेळी कृती समितीचे प्रदेश अध्यक्ष राहुल सोनटक्के,उपाध्यक्ष नानासाहेब गाढे, सचिव डॉ. प्रदीप कात्रजकर सह इतर पदाधिकारी